122

फक्त कार्यालयीन उपयोगासाठी

सत्यमेव जयते

## महाराष्ट्र शासन
## आदिवासी विकास विभाग

# आदिवासी सेवा सहकारी संस्थांच्या पुनर्रचनेनंतरच्या कामकाजाचा मूल्यमापन अहवाल जिल्हा - यवतमाळ

**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था**
महाराष्ट्र राज्य, २८, क्वीन्स गार्डन,
पुणे - ४११ ००१.

१९९५

# प्रस्तावना

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीने महाराष्ट्राच्या आणि विशेषतः ग्रामीण भागातील जनतेच्या सामाजिक व आर्थिक विकासामध्ये महत्वाची भूमिका बजावलेली आहे. सुरुवातीला ही चळवळ प्रामुख्याने शेती पत पुरवठयाच्या क्षेत्रापुरतीच मर्यादित होती. त्यानंतर शेतमाल प्रक्रिया, शेतमाल पणन, ग्रामीण भागातील उद्योग, ग्राहक भांडारे, सामाजिक सेवा सारख्या क्षेत्रात ही चळवळ झपाट्याने पसरली. सहकार क्षेत्राची गेल्या तीन दशकातील प्रगती उल्लेखनीय आहे. सन 1961 मध्ये विविध प्रकारच्या सहकारी संस्थांची संख्या तीस हजाराच्या दरम्यान होती ती तीन दशकानंतर (1991) एक लाखाच्या वर पोचली आहे.

महाराष्ट्रातील "आदिवासी" हा दुर्गम क्षेत्रात राहतो. त्यांची पूर्वीची आर्थिक परिस्थिती खूपच हलाखीची होती. त्यांचे प्रामुख्याने उपजिवीकेचे साधन म्हणजे शेती आणि जंगल होय. त्यांची सुरुवातीस मोठया प्रमाणावर आर्थिक पिळवणूक झाली. त्यांची आर्थिक पिळवणूक थांबावी, त्यांचा जलदगतीने आर्थिक आणि सामाजिक विकास व्हावा, आणि शेती विकासासाठी व अन्य आवश्यक सेवा त्वरेने उपलब्ध होण्यासाठी महाराष्ट्र शासनाने सन 1976 मध्ये "आदिवासी सेवा सहकारी संस्था" स्थापन केल्या. या संस्थांच्या विस्तृत कार्यक्षेत्रामुळे संस्थांच्या व्यवहारात व निरनिराळया उपक्रमांवर परिणामकारक नियंत्रणाचा अभाव, आर्थिक विकासामध्ये नियोजनाचा अभाव, तोटयात चाललेले व्यवहार आणि प्रशिक्षित कर्मचा-यांची वानवा यामुळे या संस्था परिणामकारक कार्य करू शकल्या नाहीत.

या समस्यांवर उपाय योजना करण्यासाठी शासनाने 1984 साली मा. पिचड समितीची नियुक्ती केली. या समितीने आदिवासी सेवा सहकारी संस्थांच्या कारभारास, संस्थांच्या उपक्रमांस आणि आर्थिक विकासास कशी अधिक गतीशिलता प्राप्त होईल याचा विचार करुन शिफारशी अहवाल शासनाकडे सादर केला. या शिफारशींचा विचार करुन महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभागाने 1990 मध्ये या संस्थांच्या पुनर्रचनेचा निर्णय घेतला. या शासन निर्णयात संस्थांच्या कार्यक्षेत्राचा विस्तार कमी करणे, कमिशन वाढविणे आणि व्यवस्थापकीय अनुदान देणे इत्यादी बाबींचा समावेश होता.

या पुनर्रचित आदिवासी विविध कार्यकारी संस्थांच्या कामकाजात झालेल्या सुधारणा आणि त्याचा आदिवासी सभासदांना झालेला लाभ अजमाविण्यासाठी यवतमाळ जिल्हयातील पुनर्रचित आदिवासी सहकारी संस्थांच्या कामकाज पध्दतीबाबत मूल्यमापन अभ्यास घेण्यात आला.

कृ.मा.प.

सदर मूल्यमापन पहाणीचे तसेच प्रारूप लेखनाचे काम श्री.पी.आर.तिकोने, संशोधन अधिकारी यांनी संस्थेतील इतर कर्मचा-यांच्या मदतीने पूर्ण केले.

हा मूल्यमापन पहाणी अहवाल आदिवासी क्षेत्रात कार्यरत असणारे आदिवासी विकास महामंडळ, आदिवासी सहकारी संस्था आणि आदिवासी विकासाच्या योजना राबविणा-या यंत्रणा यांना उपयोगी पडेल अशी अपेक्षा आहे.

(डॉ.नवीनचंद्र जैन)
आय.ए.एस.
संचालक,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य,पुणे-1.

दिनांक : 2|8|95

स्थळ : पुणे

अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण | पान क्रमांक पासून | पर्यंत |
|---|---|---|---|
| 1. | आदिवासी क्षेत्रातील आदिवासी सहकारी संस्थांची पार्श्वभूमी. | 1 | 8 |
| 2. | आदिवासी सेवा सहकारी संस्थांच्या पुनर्रचने नंतरचा मूल्यमापन अभ्यास अहवालाचे उद्दिष्ट व कार्यपध्दती. | 9 | 13 |
| 3. | क्षेत्रिय पहाणी | 14 | 25 |
| 4. | पहाणीतील निष्कर्ष व शिफारशी | 26 | 32 |
| 5. | परिशिष्ट - अ | 33 | 34 |
| | परिशिष्ट - ब | 35 | 38 |
| 6. | पहाणीकरिताची प्रश्नावली (प्रपत्र-1, प्रपत्र-2, प्रपत्र-3) | 39 | 55 |

## प्रकरण 1 ले

### आदिवासी क्षेत्रातील आदिवासी सहकारी संस्थांची पार्श्वभूमी

1·1 "सहकार" म्हणजे सर्वांच्या सहकार्याने कृती करणे हा होय· "सहकार" हा एक आदर्शवादी विचार आहे· सहकारामुळे मानवी जीवन सुखदायक व आशादायक बनते· सर्व थरातील लोकांच्या समान गरजांच्या पूर्ततेसाठी उभी केलेली संघटना म्हणजेच सहकाराची ही महान चळवळ होय· सर्व थरातील लोक जात, धर्म, सामाजिक प्रतिष्ठा विरहीत एकत्र येऊन आर्थिक उद्दिष्टे प्राप्त करुन घेण्यासाठी संघटना तयार करतात त्यास सहकारी संस्था संबोधले जाते· या सहकारी संस्थेवरच्या कामकाजावर विश्वास ठेवून सभासद एकत्र येतात· या सहकारी वृत्तींमुळे सभासदांमध्ये सहिष्णुता, एकोपा, सहकार्याची भावना यांची वाढ होते· सर्वांना सामाजिक व आर्थिक न्याय मिळतो·

1·2 सहकाराचे फायदे आदिवासींनासुध्दा मिळणे आवश्यक आहे· आदिवासी भागातील जनतेचा विकास हा जलदगतीने व्हावा व त्यांना शेतीविषयक सेवा त्वरेने उपलब्ध व्हाव्यात तसेच त्यांची स्थानिक व्यापारी व सावकार यांचेकडून होणारी पिळवणूक थांबावी हा विचार डोळयासमोर ठेवून केंद्र शासनाच्या कृषि मंत्रालयातर्फे आदिवासी विभागातील सहकारी संस्थांची पुनर्बांधणी करण्यासाठी श्री·के·एस·बावा, सहसचिव, सहकार विभाग मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक 6-12-1971 रोजी समितीची स्थापना करण्यात आली· सर्व राज्यातील आदिवासी सहकारी संस्थांच्या कार्यप्रणालीचा अभ्यास करणे, आदिवासी कल्याणांचा कार्यक्रम राबविण्यासाठी सुयोग्य प्रशासकीय यंत्रणा निर्माण करणे, वेळेवर पतपुरवठा, सुसज्ज बाजारपेठ, आदिवासींना आर्थिक मदत इत्यादींच्या अंमलबजावणीसाठी मोठया आकाराच्या ( LAMP ) आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थांची शिफारस बावा समितीने केली होती·

1·3 आदिवासी जनतेचा आर्थिक विकास हा जलद गतीने होण्यासाठी केंद्र शासनाच्या सुचनेनुसार 1976 मध्ये महाराष्ट्र राज्यात "आदिवासी उपयोजना" स्वतंत्रपणे निर्माण करण्यात आली·

अ) सावकार व व्यापारी यांचेकडून आदिवासींच्या होणा-या अडवणुकीस पायबंद घालणे·

ब) आदिवासी शेतक-यांना शेतीस पूरक अशी आवश्यक असलेली खते, बी-बियाणे, अवजारे, कर्जे इ· पुरविणे·

क) आदिवासी भागातील उत्पादित शेती मालाची विक्री करणे·

ड) आदिवासींना जीवनोपयोगी वस्तूंची रास्त भावाने विक्री करणे·

असे प्रमुख उद्देश आदिवासी उपयोजना निर्माण करण्यामागील होते. आदिवासी उपयोजनेची प्रभावी अंमलबजावणी तसेच केंद्र शासनाच्या बावा समितीच्या शिफारसी लक्षात घेवून "आदिवासी सहकारी संस्था" स्थापन करण्याचा निर्णय सन 1976 साली घेण्यात आला. त्यानुसार महाराष्ट्र राज्यातील प्रामुख्याने आदिवासी असलेल्या भागात सर्वसाधारणपणे 12,500 लोकसंख्येसाठी 1 आदिवासी सेवा सहकारी संस्था स्थापन करण्यात यावी असा निर्णय घेण्यात आला. सन 1983-84 अखेर महाराष्ट्र राज्यातील एकूण 15 जिल्हयांमध्ये 275 आदिवासी सेवा सहकारी संस्था कार्यान्वित झाल्या. या संस्था आदिवासी विकास महामंडळाच्या सभासद संस्था म्हणून काम करतात. त्याचा तपशील खालील प्रमाणे :-

तक्ता 1.1

| अ.क्र. | वर्ष | एकूण आदिवासी सेवा सहकारी संस्था |
|---|---|---|
| 1. | 1976-77 | 258 |
| 2. | 1981-82 | 258+16 माडा संस्था |
| 3. | 1982-83 | 274 + 1 |
| 4. | 1983-84 | 275 |

आधार : मा.पिचड समितीचा आदिवासी सेवा सहकारी संस्था पुनर्रचना शिफारशींचा अहवाल (84-85)

1.4 आदिवासी सेवा सहकारी संस्थांकडून प्रामुख्याने खालील कार्याची अपेक्षा ठेवण्यात आली होती.

1. आदिवासी सेवा सहकारी संस्थांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील आदिवासींना संस्थेचे सभासद करून घेणे, त्यांना शेतीसाठी कर्ज पुरवठा करणे, शेतीसाठी आवश्यक खते, बी-बियाणे स्थानिक पातळीवर उपलब्ध करून देणे.
2. आदिवासी सभासदांच्या शेतीमालाची व अन्य मालाच्या विक्रीची व्यवस्था करणे.
3. आदिवासी सभासदांना रास्त भावात जीवनावश्यक वस्तू उपलब्ध करून देणे.
4. आदिवासी क्षेत्रातील दुग्ध व्यवसाय, मजूर कंत्राटदारांची कामे, मच्छिमार व्यवसाय इ. उपक्रम संस्थांनी घेवून त्याचा आदिवासी सभासदांना लाभ द्यावा.

1·5 आदिवासी सेवा सहकारी संस्था स्थापन करताना आदिवासी संस्थांच्या कार्यक्षेत्रात असलेल्या विविध कार्यकारी सहकारी सोसायटयांचे विलीनीकरण केले जाईल व संपूर्ण कार्यक्षेत्राकरिता आदिवासी सेवा सहकारी संस्था ही एकमेव संस्था काम करील अशी अपेक्षा होती· तसेच कर्जाची वसूली समाधानकारक होईल व आदिवासी संस्थेने हाती घेतलेल्या अन्य व्यवसायातून उदा· एकाधिकार धान्य खरेदी, स्वस्त धान्य दुकान, दुग्ध व्यवसाय इ· व्यवसायांमुळे संस्थेचे आर्थिक व्यवहार वाढून संस्था आर्थिकदृष्टया कार्यक्षम होईल अशी अपेक्षा धरण्यात आली होती·

1·6 सन 1982-83 अखेर आदिवासी सेवा सहकारी संस्थांच्या आर्थिक कामकाजाचा आढावा खालीलप्रमाणे आहे·

तक्ता 1·2

आदिवासी सेवा सहकारी संस्थांचा कामकाजाचा आर्थिक आढावा

| वर्ष | कर्जदार सभासद संख्या | अपेक्षित कर्ज व्यवहार रु·लाखात | प्रत्यक्ष कर्ज व्यवहार रु·लाखात | प्रति सभासद अपेक्षित कर्ज रक्कम रुपये | प्रति सभासद प्रत्यक्ष कर्ज रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1976-77 | 500 | 5·00 | 2·23 | 1000 | 446 |
| 1977-78 | 750 | 7·78 | 3·12 | 1050 | 416 |
| 1978-79 | 875 | 9·65 | 3·30 | 1103 | 377 |
| 1979-80 | 1000 | 11·57 | 3·69 | 1158 | 369 |
| 1980-81 | 1125 | 13·67 | 3·22 | 1216 | 286 |
| 1981-82 | 1250 | 15·95 | 3·13 | 1276 | 250 |
| 1982-83 | 1325 | 16·75 | 3·37 | 1390 | 254 |

आधार : सन 1984-85 मधील मा·पिचड समितीचा आदिवासी सेवा सहकारी संस्था पुनर्रचनेचा शिफारशी अहवाल·

वरील तक्त्यावरुन असे निदर्शनास आले की, संस्थांचे सन 1982-83 मधील सभासद 1325 इतके होते· प्रति सभासदास रुपये 1390/- इतकी रक्कम कर्जरुपाने प्राप्त होणे आवश्यक होती परंतु प्रत्यक्षात 18 ते 20 टक्के इतकीच प्राप्त झाल्याचे निदर्शनास येत आहे·

1·7 सन 1982-83 मधील अल्पमुदत कर्ज वसुलीची टक्केवारी ही फक्त 29·05 टक्के तर मध्यम मुदतीच्या 30 टक्के इतकी होती· याच काळात शेतकरी सभासदांकडून 925·79

लाख इतके अल्प मुदतीचे कर्ज थकीत होते. याशिवाय आदिवासी संस्थांनी घेतलेल्या निरनिराळया उपक्रमातून देखील संस्थांना आर्थिक नुकसान सोसावे लागले. आदिवासी संस्थांचा व्यवस्थापन खर्च हा संस्थांना मिळालेल्या उत्पन्नातून भागविणे अशक्य होत गेले व संस्था तोटयात गेल्या.

तक्ता क्र.1.3

आदिवासी सेवा सहकारी संस्थांची आर्थिक स्थिती (नफा-तोटा)

| वर्ष | आ.से.सहकारी संस्था | नफयातील संस्था (संख्या) | नफयातील रक्कम रु.लाखात | तोटयातील संस्था (संख्या) | तोटयातील रक्कम रु.लाखात | ना नफा ना तोटा संस्था (संख्या) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1976-77 | 222 | 31 | 4.53 | 189 | 44.28 | 2 |
| 1977-78 | 258 | 18 | 4.52 | 238 | 94.36 | 2 |
| 1978-79 | 258 | 46 | 27.24 | 212 | 119.93 | - |
| 1979-80 | 258 | 7 | 1.33 | 251 | 167.77 | - |
| 1980-81 | 274 | 30 | 16.86 | 236 | 223.83 | - |
| 1981-82 | 274 | 148 | 107.98 | 123 | 47.49 | 3 |
| 1982-83 | 275 | 41 | 10.44 | 230 | 96.49 | 4 |

आधार : सन 1984-85 मधील मा.पिचड समितीचा आदिवासी सेवा सहकारी संस्था पुनर्रचनेचा शिफारशी अहवाल.

1.8 वरील तक्त्यावरुन सन '1982-83 या आर्थिक वर्षात 275 आदिवासी सेवा सहकारी संस्थांपैकी 230 आदिवासी सेवा सहकारी संस्था तोटयात असल्याचे दिसून येते. आदिवासी सेवा सहकारी संस्थांची आर्थिक स्थिती दिवसेंदिवस खालावत असल्याने त्यांचे व्यवहार सुरळीत पार पाडणे, सभासदांना जलद लाभ मिळणे आवश्यक आहे. सहकारी संस्थांच्या कारभारामध्ये लवचिकता आणण्याच्या दृष्टीने व सहकारी संस्था आर्थिकदृष्टया सक्षम होण्याकरिता आदिवासी सेवा सहकारी संस्थेच्या कामकाजाचा सखोल अभ्यास करुन त्या चांगल्या रितीने कशा कार्यान्वित होतील या दृष्टीने तातडीने उपाय योजना करणे आवश्यक होते. यासाठी शासनाने मा.आमदार श्री.मधुकररावजी पिचड यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय शासन निर्णय क्र.एसीएस-1081/(1959)/का-4, दि.30-1-1984 अन्वये

समिती स्थापन केली. (पहा परिशिष्ट-अ) सदर समितीने शिफारशींचा अहवाल दि. 16 नोव्हेंबर 1984 रोजी शासनास सादर केला. त्यातील संक्षिप्त स्वरूपातील शिफारशी खालीलप्रमाणे:

मा. पिचड समितीच्या आदिवासी सहकारी संस्थेच्या पुनर्रचना संबंधीच्या शिफारशी:

(सारांश)

1. आदिवासी सेवा सहकारी संस्थांचे कार्यक्षेत्र जास्तीत जास्त 10 कि.मी. पर्यंत असावे.

2. कार्यक्षेत्रातील लोकसंख्या 5000 च्या आसपास असावी. ती 4000 पेक्षा कमी व 6000 पेक्षा जास्त नसावी.

3. नैसर्गिक परिस्थिती लक्षात घेवून व सभासदांची गैरसोय टाळण्याकरिता वरील नियमात शिथिलता आणून संस्था स्थापन करावी.

4. आदिवासी सभासदांच्या पीक कर्ज थकबाकीचे 10 वार्षिक हप्त्यात रुपांतर करण्यात यावे.

5. आदिवासी सभासदांचा आर्थिक विकास जलद होण्यासाठी मध्यम मुदतीचे कर्ज द्यावे. अल्प मुदत कर्ज थकबाकी असल्यास मध्यम मुदत कर्ज मिळण्यास अपात्र ठरवू नये. तसेच शासकीय ठरावानुसार आदिवासी सभासदांना पीक कर्ज शासकीय ठराव क्र. समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग क्र. एसीएस-1071/685-××, दिनांक 18-8-76 अन्वये बिनव्याजी मिळण्याची अंमलबजावणी त्वरीत करण्यात यावी.

6. आदिवासी संस्थांनी शेतीविषयक खते, बी-बियाणे व औषधे यांचा व्यवहार स्वतः करावा व अशी साधने पुरविण्याची जबाबदारी आदिवासी विकास महामंडळाने उचलावी.

7. संस्थेच्या एकाधिकार धान्य खरेदी केंद्रामध्ये होणारे नुकसान (तोटा) हा आदिवासी विकास महामंडळाने सोसावा अथवा प्रति क्विंटल मिळणारे कमिशन त्या केंद्राचा सर्व खर्च भागतील अशारितीने वाढवून द्यावा.

8. संस्थेच्या रास्त भावाचे दुकान व्यवहारात कमिशन वाढवून द्यावे त्यामुळे संस्थेचे खर्च भागतील.

9. आदिवासी सहकारी संस्थेत कमीत कमी 4 सेवकांचा कर्मचारी वृंद असावा तसेच इतर संस्थेप्रमाणे सचिवांची नियुक्ती व्हावी.

10. संस्थेवरील सचिवांना ग्रामसेवक अथवा तलाठयांच्या वेतनाप्रमाणे वेतन द्यावे.

11. संस्थेचा वाढता व्याप लक्षात घेवून कर्मचारी वर्ग वाढविण्याबाबत जिल्हा उपनिबंधक यांची पूर्व परवानगी घ्यावी.

12. आदिवासी विकास महामंडळाचा प्रतिनिधी जिल्हास्तरीय संवर्गीकरण समिती व तत्सम समितीवर नेमण्यात यावा.

13. आदिवासी सहकारी संस्थेस सुरुवातीच्या 15 वर्षाच्या कालावधी पर्यंत अथवा ती स्वयंपूर्ण होईपर्यंत ना नफा ना तोटा या तत्वावर काम करता येईल अशा प्रकारे व्यवस्थापकीय अनुदान द्यावे.

14. पुनर्रचित आदिवासी सेवा सहकारी संस्थेचे आर्थिक व्यवहार सुरळीत पार पाडण्यासाठी रु.5000/- शासकीय भाग भांडवल देण्यात यावे.

15. आदिवासी सेवा सहकारी संस्थांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी एक उपसमिती नेमावी व त्यावर जिल्हा उपनिबंधक व आदिवासी सेवा सहकारी संस्थांचा एक प्रतिनिधी यांना प्रतिनिधीत्व द्यावे. तसेच कर्ज पुरवठा व्यवस्थित होण्यासाठी 5 वर्षाचे अंदाजपत्रक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी करुन त्याप्रमाणे कर्ज पुरवठा करावा.

16. आदिवासी सेवा सहकारी संस्थांसारखी समान उद्दिष्ट असलेली संस्था काढण्यात येवू नये.

17. आदिवासी सहकारी संस्थांना ऑडिट फी व सुपरव्हीजन फी माफ करण्यात यावी.

18. संस्थेच्या व खात्याच्या परवानगीशिवाय नोंदविलेल्या दुग्ध संस्थांचा संपूर्ण व्यवहार त्या त्या भागातील आदिवासी संस्थांकडे सुपूर्त करण्यात यावा.

19. आदिवासी सेवा सहकारी संस्थांना मजूर कंत्राटदारी संस्था समजण्यात येवून तिच्या कार्यक्षेत्रातील व जवळपासचे काम तिला देण्यात यावे. तसेच इतर मजूर कंत्राटदारी संस्थांप्रमाणे अर्थसहाय्य उपलब्ध करुन द्यावे.

20• आदिवासी सेवा सहकारी संस्थांच्या कार्यक्षेत्रात मच्छिमारीस वाव असेल तर त्यांना मच्छिमारी संस्था म्हणून घोषित करून आर्थिक व शासकीय लाभ द्यावेत•

21• आदिवासी सेवा सहकारी संस्थांच्या पुनर्रचनेचा शासनाचा निर्णय अंतिम असावा व त्यावर अपील करण्याची कोणतीही तरतूद नसावी•

22• आदिवासी सेवा सहकारी संस्थांच्या कामकाजाच्या मूल्यमापनासाठी व समस्या सोडविण्यासाठी राज्यस्तरीय समिती असावी•

23• सूचना : 1•मालाची प्रक्रिया केंद्रे सुरु करावीत•
2• महाराष्ट्र राज्य आदिवासी सहकारी बँकेची स्थापना करावी•

1•9 वरील प्रमाणे अनेक महत्वपूर्ण शिफारशी समितीने शासनास केल्या होत्या• त्या शिफारशींचा महाराष्ट्र शासनाने गांभिर्याने विचार करून आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र•एसीएस-1084/41973/प्रक्र•1534/का-4, दिनांक 24-4-90 अन्वये आदिवासी सेवा सहकारी संस्थांची पुनर्रचना केली• ﴾पहा परिशिष्ट-ब﴿ त्यामध्ये खालील बाबतीत शासनाने निर्णय घेतले आहेत•

1• आदिवासी सेवा सहकारी संस्थांचे कार्यक्षेत्र कमी करण्यात यावे•

2• आदिवासी सेवा सहकारी संस्था या "आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था" या नावाने संबोधल्या जाव्यात•

3• एकाधिकारी खरेदीमध्ये कमिशन वाढवून देणे•

4• रास्त भावाचे धान्य दुकान व्यवहारात मिळणारे कमिशन वाढवून देणे•

5• आदिवासी सेवा सहकारी संस्थांना चतुर्थ वर्ष व सातव्या वर्षाकरिता देण्यात आलेल्या व्यवस्थापकीय कर्जाचे अनुदानात रुपांतर करणे•

6• पुनर्रचित संस्थांना धान्य खरेदी व स्वस्त कापड दुकाने हे उपक्रम चालविण्याकरिता प्रतिवर्षी अनुदान देणे•

7• पुनर्रचित संस्थांना त्यांचे कार्यक्षेत्रातील दुग्ध व्यवसाय, मजूर कंत्राटदारी कामे, मत्स्य व्यवसाय इ• व्यवसाय त्यांना हाताळण्यासाठी शासन मंजुरी•

८. पुनर्रचित संस्थांना जास्तीत जास्त 5 वर्षासाठी 100 टक्के व्यवस्थापकीय अनुदान देण्यास मान्यता.

वरील शासनाच्या आदेशानुसार 1990-91 या आर्थिक वर्ष असेर आदिवासी सेवा सहकारी संस्थांच्या पुनर्रचना करण्यात आल्या.

....

## प्रकरण 2 रे

### आदिवासी सेवा सहकारी संस्थांच्या पुनर्रचनेनंतरचा मूल्यमापन अभ्यास अहवालाचे उद्दिष्ट व कार्यपद्धती:

2·1 मा·पिचड समितीच्या {सन 1984-85 च्या} आदिवासी सेवा सहकारी संस्था पुनर्रचने बाबतच्या अहवालातील शिफारशींची दखल घेवून आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी शासन निर्णय क्र·एसीएस-1084/41973/प्र·क्र·1534/का-4, दि·24-4-90 अन्वये आदिवासी सेवा सहकारी संस्थांची पुनर्रचना केली· या शासन निर्णयानुसार सन 1992 मध्ये एकूण 15 जिल्हयात 909 आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था स्थापन करण्यात आल्या· या सर्व संस्था महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या अधिपत्याखाली कार्यरत आहेत· या पुनर्रचनेच्या प्रक्रियेस 2 वर्षाचा कालावधी पार पाडल्यानंतर सदर आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थांच्या कामकाजाचे यथार्थदर्शी मूल्यमापन करणे अगत्याचे वाटले म्हणून या मूल्यमापन अभ्यास अहवालासाठी खालील उद्दिष्टे डोळयासमोर ठेवण्यात आली·

2·2 उद्दिष्टे :

1· आदिवासी सेवा सहकारी संस्थांच्या पुनर्रचनेपूर्वीची कार्यपध्दती अवलोकन करणे व या कार्यपध्दतीचा आदिवासींच्या विकासावर काय परिणाम होत होता हे जाणून घेणे·

2· आदिवासी सेवा सहकारी संस्थांच्या पुनर्रचनेनंतर संस्थांच्या कार्यपध्दतीमध्ये घडून आलेल्या बदलाचे सविस्तर विवेचन करणे·

3· आदिवासी सेवा सहकारी संस्थांच्या पुनर्रचनेनंतर आदिवासीच्या विकासास गती प्राप्त झाली आहे किंवा कसे याचा आढावा घेणे·

2·3 पध्दती :

उपरोक्त उद्दिष्टांच्या अनुषंगाने राज्यातील काही जिल्हयातील आदिवासी सहकारी संस्थांची माहिती मागविण्यात आली· या जिल्हयांमधून "यवतमाळ" या जिल्हयाची क्षेत्रीय पहाणीसाठी निवड करण्यात आली· यवतमाळ जिल्हयातील पुसद, यवतमाळ, कळंब व मारेगांव हया तालुक्यातील आदिवासी सहकारी संस्थांचे सर्वेक्षण करण्याचे ठरले·

## 2.4 यवतमाळ जिल्हयाची भौगोलिक स्थिती :

1. यवतमाळ हा अमरावती महसूली विभागातील सर्वात मोठा जिल्हा आहे. त्याचे क्षेत्र विस्तृत म्हणजे 13,584 चौ.कि.मी. आहे. राज्याच्या एकूण क्षेत्रफळापैकी हा भू-भाग 4.5 टक्के इतका आहे. यवतमाळ जिल्हयात एकूण 16 तालुके आस्तित्वात आहेत. यवतमाळ जिल्हा लहान लहान अजिंठा पर्वताच्या रागांनी पूर्व-उत्तर दिशेने घेरलेला असून पैनगंगा व वर्धा नद्या जिल्हयाच्या सिमेवरून वाहतात. भौगोलिकदृष्टया जिल्हयाच्या मध्यभागामध्ये उत्तुंग असे उंच घाट असून समुद्र सपाटीपासून या घाटांची उंची 300 ते 500 मीटर आहे. या जिल्हयातील जमीन चांगल्या प्रतीची व सुपिक आहे. चुनखडी व कोळसा हे दोन महत्वाचे खनीज जिल्हयात आढळतात. जिल्हयातील हवामान उष्ण व कोरडे असून जिल्हयात मध्यम स्वरूपाचा पाऊस पडतो. सन 1992 मधील मारेगांव केंद्राचे पर्जन्यमान 600.4 मि.मी. इतके होते. सन 1991 च्या जनगणनेनुसार यवतमाळ जिल्हयाची लोकसंख्या 20,77,144 इतकी असून त्यापैकी आदिवासींची लोकसंख्या 4,45,840 इतकी आहे. त्याचे प्रमाण 21.46 टक्के इतके आहे. जिल्हयात एकूण काम करणा-यापैकी 27.03 टक्के शेतकरी व 53.52 टक्के शेतमजूर तर इतर उद्योग व्यवसायातील काम करणारांची संख्या 20 टक्के इतकी आहे. (सन 1991 ची जनगणना) जिल्हयातील एकूण पुरुष लोकसंख्येपैकी 70.40 टक्के पुरुष तर एकूण स्त्री लोकसंख्येपैकी 44.80 टक्के स्त्रीया साक्षर आहेत. यातील ग्रामीण भागातील साक्षरतेचे प्रमाण 53.72 तर ग्रामीण भागातील स्त्रीयांचे साक्षरतेचे प्रमाण 39.75 टक्के इतके आहे. यवतमाळ जिल्हयात यवतमाळ तालुक्याचे साक्षरतेचे प्रमाण जास्त आहे.

2. यवतमाळ जिल्हयात वनक्षेत्र विस्तृत प्रमाणात आहे. पुसद, यवतमाळ, कळंब, मारेगांव हया तालुक्यांचा समावेश वनक्षेत्रात येतो. या तालुक्यांच्या वनक्षेत्रात वनोत्पादने आढळून येतात. या जिल्हयात लागवडी लायक क्षेत्र 67.33 टक्के होते. सन 1988-89 या वर्षातील 48.82 टक्के क्षेत्र अन्न धान्य पिकाखाली होते. त्यात कापूस, ज्वारी, डाळी, गहू, ऊस व गळीत धान्यांचा समावेश आहे व सन 1992 मध्ये त्यांच्या उत्पादनात वाढ झालेली आहे. दर हेक्टरी उत्पादन चांगले आहे. पिकांच्या उत्पादनाकरीता रासायनिक खतांचा वापर मोठया प्रमाणात होतो. जिल्हयामध्ये विहिरी, लघु पाटबंधारे मध्यम प्रकल्प, उपसा सिंचन योजना इ. सिंचन सुविधा आस्तित्वात आहे.

3. यवतमाळ, मारेगांव, पुसद व पांढरकवडा येथून दूध संकलनाचे काम मोठया प्रमाणात होते. 1992-93 मध्ये जिल्हयात 332 सहकारी दुग्ध संस्था आहेत. कुक्कुटपालन व मत्स्य व्यवसाय हे व्यवसाय मोठया प्रमाणावर जिल्हयात आढळतात. सर्व खेडी रस्त्यांनी जोडलेली आहेत, तसेच जिल्हयाचे ठिकाण रेल्वेने जोडले आहे.

4. सन 1992-93 या वर्षाच्या अखेरीस जिल्हयात एकूण 1,871 सहकारी संस्था होत्या व सभासद संख्या 6,25,000 इतकी आहे. वरील सहकारी संस्थापैकी 503 प्राथमिक कृषि सहकारी व 1,273 बिगर कृषि पतसंस्था आणि पणन उत्पादन संस्था आहेत.

5• सन 1991 च्या जनगणनेनुसार यवतमाळ जिल्हयात आदिवासींची लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या 21•46 टक्के आहे• त्यामध्ये यवतमाळ (22•34 टक्के), कळंब (34•38 टक्के), राळेगांव (31•30 टक्के), मारेगांव (39•63 टक्के), पुसद (16•61 टक्के) व केळापूर (35•83 टक्के) या तालुक्यांचा समावेश आहे व या तालुक्यांमध्ये आदिवासी उपयोजना राबविली जाते• या उपयोजनेतंर्गत आदिवासींच्या विकासाकरिता विविध योजना राबविल्या जातात• या जिल्हयामध्ये सन 1992-93 मध्ये रु•1255•45 लाख विविध विकास योजनांवर खर्च करण्यात आला आहे•

2•5 सुपीक जमीन, दळणवळणाच्या सुविधा, साक्षरतेचे चांगले प्रमाण, कृषि क्षेत्रातील 80 टक्के लोकसंख्या, इतर शेतीप्रधान उद्योगधंदे, सहकाराचे विखुरलेले जाळे, शैक्षणिकदृष्ट्या पुढारलेला, सिंचन सुविधा इ• दृष्टया विकसित झालेल्या या जिल्हयामधून पुसद, यवतमाळ, कळंब, मारेगांव या तालुक्यातील आदिवासी सहकारी संस्थांची निवड क्षेत्रीय पहाणीसाठी करण्यात आली• या तालुक्यातील सन 1992-93 मध्ये खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे संस्था अस्तित्वात होत्या•

तक्ता 2•1

| अ•क्र• | तहसिल | आदिवासी सहकारी संस्था (संख्या) |
|---|---|---|
| 1• | पुसद | 10 |
| 2• | यवतमाळ | 17 |
| 3• | कळंब | 19 |
| 4• | मारेगांव | 13 |
| | एकूण | 59 |

2•6 पुसद तालुक्यातून 4, यवतमाळ तालुक्यातून 5, कळंब तालुक्यातून 6, मारेगांव तालुक्यातून 1 अशा एकूण 16 संस्थांची क्षेत्रीय पहाणीसाठी निवड करण्यात आली• पहाणीसाठी निवडलेल्या संस्था ह्या तालुका क्षेत्राच्या चारही टोकाकडे विखुरलेल्या असून त्या शहरी भागापासून दूर अशा आदिवासी भागातील आहेत•

तक्ता 2·2

पहाणीसाठी निवडलेल्या आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था, जि·यवतमाळ

| अ·क्र· | तालुका | आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थचे मुख्यालय | आदिवासी उपयोजन क्षेत्र |
|---|---|---|---|
| 1· | पुसद | 1· घटेली | अ·आ·उ·योजना क्षेत्र |
| | | 2· सावरगांव गोरे | -"- |
| | | 3· पारवा | -"- |
| | | 4· माणिक डोह | माडा क्षेत्र |
| 2· | यवतमाळ | 5· खानगांव | बिगर आदिवासी क्षेत्र |
| | | 6· दहेली | माडा क्षेत्र |
| | | 7· बोधगव्हाण | -"- |
| | | 8· आकपुरी | -"- |
| | | 9· पार्डीनाका | -"- |
| 3· | कळंब | 10·जोडमोहा | अतिरिक्त आ·उ·यो·क्षेत्र |
| | | 11·शरद | -"- |
| | | 12·झाडकिन्ही | -"- |
| | | 13·पेटगव्हाण | माडा क्षेत्र |
| | | 14·नर्सापूर | मोडा क्षेत्र |
| | | 15·डोंगरखडी | अ·आ·उ·योजना क्षेत्र |
| 4· | मारेगांव | 16·सराटी | आ·उपयोजन क्षेत्र |

वरील तक्त्यावरुन असे दिसेल की, आदिवासी उपयोजन क्षेत्रातील 1, अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रातून 7, माडा क्षेत्रातून 7, व बिगर आदिवासी क्षेत्रातून 1 अशा 16 आदिवासी विविध कार्यकारी संस्थांची निवड करण्यात येऊन त्यांच्याकडून प्रपत्र-1 मधील प्रश्नावलीद्वारे माहिती संकलीत करण्यात आली· आदिवासी विविध कार्यकारी सह संस्थांनी दिलेल्या माहितीस पुष्टी देण्याकरिता त्या त्या संस्थेच्या लाभधारकांकडून प्रपत्र-2 मधील

प्रश्नावलीद्वारे संस्थेशी संबंधित विविध बाबींची माहिती संकलीत केली. तसेच संस्थेशी संबंधित शासकीय यंत्रणेतील सहनिबंधक, सहकारी अधिकारी आणि आदिवासी विकास महामंडळाच्या प्रादेशिक अधिका-यांकडून प्रपत्र-3 मधील प्रश्नावलीमधून संस्थेच्या कार्यप्रणालीबाबत अभिप्राय नोंदविण्यात आलेले आहेत.

2.7 16 संस्था, त्यांचे 72 लाभार्थी यांच्याकडून मिळविलेल्या माहितीचे तक्तीकरण व पृथःक्करण करण्यात आले. त्यातून निघालेल्या निष्कर्षांचा सांगोपांग विचार पुढील प्रकरणात करण्यात आला आहे. तसेच संस्थेच्या कार्यपध्दतीच्या अभिप्रायाबाबत सह-निबंधक महामंडळाचे अधिकारी यांनी व्यक्त केलेल्या मतांची दखल शिफारस प्रकरणात व इतर समर्पक मुद्दयांच्याबाबत घेण्यात आली आहे. या पहाणीतील निष्कर्ष व शिफारशी मुख्यत्वे क्षेत्रीय पहाणीवरच आधारित आहेत.

....

## प्रकरण 3 रे

---

## क्षेत्रीय पहाणी

---

3·1 महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र·एसीएस-1084/41973/प्रक्र·1534/का-4, मंत्रालय, मुंबई दिनांक 24 एप्रिल 1990 अन्वये शासनाने आदिवासी सेवा सहकारी संस्थांची पुनर्रचना करणेचा निर्णय घेतला· त्यानुसार सन 1990 च्या अखेरीस सर्व आदिवासी सेवा सहकारी संस्था ह्या "आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था" म्हणून ओळखल्या जावू लागल्या· आदिवासी सहकारी संस्थांची पुनर्रचना झाल्यानंतर त्यांच्या मूल्यमापन अभ्यासासाठी यवतमाळ जिल्हयातील 16 आदिवासी सहकारी संस्थांची निवड करण्यात आली· सदर मूल्यमापन अभ्यास अहवाल हा दिनांक 24 एप्रिल 1990 च्या शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या बाबींवर आधारित आहे· (पहा परिशिष्ट ब) आदिवासी सेवा सहकारी संस्थांची पुनर्रचना करताना त्याचा लाभ प्रत्येक आदिवासी सभासदांना मिळेल हा दृष्टीकोन शासनाने निश्चित केला व त्यानुसार निर्णय घेण्यात आला· शासनाने घेतलेला निर्णय व त्यामुळे आदिवासी सहकारी संस्थेच्या रचना कार्यपध्दतीत झालेला बदल याचा ऊहापोह क्षेत्रीय पाहणीद्वारे मिळालेल्या माहितीनुसार खालील प्रमाणे बाबनिहाय करण्यात येत आहे·

### 3·2· आदिवासी सेवा सहकारी संस्थांची पुनर्रचना करणे :

3·2·1 महाराष्ट्र राज्यात सध्या अस्तित्वात असलेल्या आदिवासी सेवा सहकारी संस्थांचे कार्यक्षेत्र हे सुमारे 30 ते 40 कि·मी·अंतराच्या परिसरात पसरलेले असल्यामुळे एवढया मोठया कार्यक्षेत्रात पसरलेल्या आदिवासी सेवा सहकारी संस्थांवर नियंत्रण ठेवणे आणि सभासदांना सहाय्य करणे अडचणीचे ठरत असे· त्यामुळे संस्थेचा हेतू साध्य होत नसल्याने आदिवासी सहकारी संस्थेचे कार्यक्षेत्र 5 ते 10 कि·मी·पर्यंतच ठेवून व साधारणपणे 5000 लोकसंख्येसाठी एक याप्रमाणे नव्याने आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था निर्माण करण्याचा निर्णय शासनाने घेतला·

3·2·2 वरील निर्णयाची यवतमाळ जिल्हयात अंमलबजावणी झाली कां ? हा हेतू ठेवून आदिवासी सहकारी संस्थांची सांख्यिकी आकडेवारी गोळा करण्यात आली· ती खालील प्रमाणे आहे·

तक्ता 3·1

यवतमाळ जिल्हयातील आदिवासी सहकारी संस्थांची तालुकानिहाय माहिती

| अ·क्र· | तालुका | तालुक्यातील एकूण ग्रामीण लोकसंख्या (1991 ज·ग·) | ग्रामीण भागातील आदिवासींची लोकसंख्या (1991 ज·ग·) | आदिवासी सहकारी संस्था पुनर्रचनेपूर्वी | पुनर्रचनेनंतर | एका आदिवासी सहकारी संस्थेमागे येणारी सरासरी लोकसंख्या (पुनर्रचनेनंतर) एकूण (लोकसंख्या) | आदिवासी (लोकसंख्या) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1· | यवतमाळ | 1,42,321 | 49,236 | 3 | 17 | 8,371 | 2,896 |
| 2· | बाभुळगांव | 79,305 | 16,729 | - | 1 | 79,305 | 16,729 |
| 3· | कळंब | 82,184 | 28,259 | 3 | 19 | 4,325 | 1,487 |
| 4· | राळेगांव | 92,325 | 28,898 | 1 | 4 | 23,081 | 7,224 |
| 5· | मारेगांव | 1,21,246 | 48,055 | 4 | 13 | 7,101 | 3,696 |
| 6· | वणी | 1,09,607 | 19,003 | - | - | - | - |
| 7· | केळापूर | 1,06,973 | 43,490 | 2 | 15 | 7,131 | 2,899 |
| 8· | घाटंजी | 1,21,056 | 39,717 | 2 | 6 | 20,176 | 6,619 |
| 9· | उमरखेड | 1,60,778 | 31,412 | 2 | 7 | 22,968 | 4,487 |
| 10· | महागांव | 1,28,830 | 19,806 | - | - | - | - |
| 11· | पुसद | 1,78,719 | 35,331 | 4 | 10 | 17,871 | 3,533 |
| 12· | दिग्रस | 1,73,707 | 32,793 | - | - | - | - |
| 13· | दारव्हा | 1,27,077 | 15,477 | - | - | - | - |
| 14· | नेर | 96,085 | 9,759 | - | - | - | - |
| | एकूण | 17,20,213 | 4,17,965 | 21 | 92 | 18,698 | 4,543 |

आधार : 1· महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, वार्षिक अहवाल सन 1988-89व 1992-93

2· आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणेची सांख्यिकी मालिका क्र·36 (सन 1991 जनगणनेची आकडेवारी)

3·2·3 तक्ता क्र·3·1 चे अवलोकन केले असता आदिवासी सहकारी संस्थांच्या पुनर्रचनेपूर्वी यवतमाळ जिल्हयात फक्त 21 आदिवासी सेवा सहकारी संस्था होत्या· परंतु पुनर्रचनेनंतर त्यांची संख्या 92 झालेली दिसून येईल· एकूण 14 तालुक्यांपैकी यवतमाळ, कळंब, मारेगांव, केळापूर व पुसद या 5 तालुक्यांमध्ये आदिवासी सहकारी संस्थांचे प्रमाण जास्त आहे· तर वणी, महागांव, दिग्रस, दारव्हा आणि नेर या 5 तालुक्यांमध्ये एकही आदिवासी सहकारी संस्था अस्तित्वात नाही· एकूण नऊ तालुक्यांमध्ये या संस्था आढळून येत आहेत·

3·2·4 किती लोकसंख्येमागे एक आदिवासी सहकारी संस्था आहे याचा आढावा घेताना या संस्था प्रामुख्याने ग्रामीण भागात असतात त्यामुळे ग्रामीण लोकसंख्येचा याबाबत विचार करणे अधिक हितावह ठरेल· यवतमाळ जिल्हयातील एकूण ग्रामीण लोकसंख्या (आदिवासींसह) 17,20,213 इतकी तर यापैकी 4,17,965 इतकी ग्रामीण आदिवासी लोकसंख्या आहे· यवतमाळ जिल्हयातील एकूण ग्रामीण लोकसंख्येचा विचार करता 18,698 इतकी लोकसंख्या एका संस्थेमागे तर 4,543 इतकी ग्रामीण आदिवासी लोकसंख्या एका संस्थेमागे असल्याचे दिसून येते· यवतमाळ जिल्हयातील तालुक्यांचा विचार केला असता यवतमाळ, कळंब, मारेगांव व केळापूर या 4 तालुक्यांमध्ये एका आदिवासी संस्थेमागे एकूण ग्रामीण लोकसंख्या 10 हजारापेक्षा कमी तर राळेगांव, घाटंजी, उमरखेड व पुसद या 4 तालुक्यांमध्ये एका आदिवासी सेवा सहकारी संस्थेमागे एकूण ग्रामीण लोकसंख्या 10 ते 25 हजार दरम्यान आहे· बाभुळगांव या तालुक्यात फक्त एकच संस्था आहे·

3·2·5 ग्रामीण आदिवासी लोकसंख्या व आदिवासी सहकारी संस्था यांची सांगड घातली असता यवतमाळ जिल्हयात यवतमाळ, कळंब, मारेगांव, केळापूर, उमरखेड व पुसद या 6 तालुक्यांमध्ये ग्रामीण आदिवासी लोकसंख्या 5000 पेक्षा कमी तर राळेगांव व उमरखेड या 2 तालुक्यांमध्ये 5000 ते 10000 या दरम्यान आढळून येत आहे· ही लोकसंख्या आकडेवारी सन 1991 च्या जनगणनेवर आधारित आहे·

3·2·6 यवतमाळ जिल्हयातील पहाणीसाठी निवडलेल्या तालुक्यांतील आदिवासी सहकारी संस्थांच्या कार्यक्षेत्रातील गावांची माहिती गोळा केली असता ती खालील प्रमाणे आढळली·

तक्ता 3·2

आदिवासी सहकारी संस्थांच्या कार्यक्षेत्रातील गांवे जि·यवतमाळ

| अ·क्र· | तालुक्याचे नांव | निवडलेल्या संस्थांची संख्या | निवडलेल्या संस्थांमधील गावांचीसंख्या | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | 4 व त्यापेक्षा कमी | 5 ते 10 | 10 व त्यापेक्षा जास्त गांवे |
| 1· | पुसद | 4 | 2 | 2 | - |
| 2· | यवतमाळ | 5 | 3 | 2 | - |
| 3· | कळंब | 6 | 4 | 2 | - |
| 4· | मारेगांव | 1 | - | 1 | - |
| | एकूण | 16 | 9 | 7 | - |

वरील माहिती अन्वये हे निदर्शनास येत आहे की, पूर्वीच्या आदिवासी सेवा सहकारी संस्थांची पुनर्रचना केल्यानंतर संस्थेच्या कामकाजाच्या दृष्टीने कार्यक्षेत्रातील गांवे कमी करण्यात आल्याचे निदर्शनास येत आहे· एकूण 16 संस्थांपैकी 9 संस्थांमध्ये 4 पेक्षा कमी गांवे तर 7 संस्थांमध्ये 5 ते 10 गांवे आढळून आली आहेत·

3·2·7 सह निबंधकाकडून मिळालेल्या माहितीनुसार आदिवासी सेवा सहकारी संस्थांच्या पुनर्रचनेपूर्वी एकूण 544 गावांकरिता 21 आदिवासी सेवा सहकारी संस्था यवतमाळ जिल्हयात अस्तित्वात होत्या· पुनर्रचनेनंतर 544 गावांकरिता आता 92 आदिवासी सहकारी संस्था निर्माण करण्यात आलेल्या आहेत· सरासरी एका संस्थेमध्ये 6 गावांचा समावेश असलेला आढळून येत आहे·

3·2·8 लाभधारकांकडून गोळा केलेल्या माहितीमध्ये आदिवासी सेवा सहकारी संस्थांचे पुनर्रचनेनंतर संस्थांचे कार्यक्षेत्र कमी झाल्यामुळे संस्थेच्या कारभारात सुधारणा झाल्याचे लाभधारांकांचे मत आहे·

तक्ता 3·3

आदिवासी सहकारी संस्थांचे कार्यक्षेत्र कमी केल्यामुळे कारभारात सुधारणा··लाभधारकांचे मत

| अ·क्र· | तालुका | एकूण लाभार्थी | कारभारात सुधारणा नाही | कारभारात सुधारणा झाली | भाष्य नाही |
|---|---|---|---|---|---|
| 1· | पुसद | 15 | 1 | 6 | 8 |
| 2· | यवतमाळ | 25 | - | 22 | 3 |
| 3· | कळंब | 32 | - | 23 | 9 |
| | एकूण | 72 | 1 | 51 | 20 |
| | | | (1 टक्का) | (71 टक्के) | (28 टक्के) |

वरील तक्त्यावरुन असे दिसून येईल की, 71 टक्के लाभधारकांचे सुधारणे विषयीचे मत चांगले आहे· परंतु 28 टक्के लाभधारकांनी याबाबत आपले मत व्यक्त केलेले नाही, तर 1 टक्का मत सुधारणा नाही असे दर्शवित आहे·

थोडक्यात, कार्यक्षेत्र कमी करण्याचा शासनाचा निर्णय योग्य असल्याचा व तो अंमलात आल्याचे वरील विवेचनावरुन निदर्शनास येत आहे·

3·3 एकाधिकार खरेदीमध्ये कमिशन वाढवून देणे :

3·3·1 आदिवासी सेवा सहकारी संस्था हया आदिवासी विकास महामंडळाच्या "सब एजन्ट" म्हणून एकाधिकार धान्य खरेदी केंद्र चालवित आहेत· 1987-88 मध्ये 256 आदिवासी संस्थांनी 498 एकाधिकार धान्य खरेदी केंद्रे चालविली होती व या खरेदी केंद्रांद्वारे 12,49,980 क्विंटल मालाची खरेदी केली होती· जानेवारी, 1984 पासून रुपये 5/- प्रति क्विंटल कमिशन मिळत होते· तथापि ब-याच सहकारी संस्थांना एकाधिकार खरेदीमध्ये फार मोठया प्रमाणात तोटा येत होता असे दिसून येते·

3·3·2 आदिवासी जनतेची स्थानिक व्यापा-यांकडून अडवणूक होऊ नये याकरिता सन 1976 च्या "ट्रायबल इकॉनॉमिक कंडिशन्स ॲक्टच्या" तरतूदीनुसार एकाधिकार खरेदी योजना ही आदिवासी भागात अंमलात आलेली आहे· एकाधिकार खरेदी सेवा ही आदिवासींच्या दृष्टीने

अत्यावश्यक सेवा असून त्यांना येणा-या तोटयाची काळजी महामंडळाने घेणे आवश्यक आहे. या व्यवहारात होणा-या आर्थिक नुकसानीची भरपाई आदिवासी विकास महामंडळाने करून देणे अथवा संस्थांना एकाधिकार खरेदी व्यवहारात मिळणारे प्रति क्विंटल कमिशन हे संस्थांना आर्थिक नुकसान होणार नाही अशारितीने वाढवून द्यावे.

3.3.3 आदिवासी सेवा सहकारी संस्थांच्या पुनर्रचनेनंतर संस्थांच्या संख्येत वाढ झाली. जून, 93 अखेर आदिवासी विकास महामंडळाच्या 593 आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थांच्या सहकार्याने 673 खरेदी केंद्रामार्फत एकाधिकार खरेदी योजना राबविण्यात येत आहे. आदिवासी सहकारी संस्थांना होणारा तोटा लक्षात घेवून मा.पिचड समितीच्या शिफारशीनुसार आदिवासी सहकारी संस्थांना सध्या प्रति क्विंटल मागे देण्यात येत असलेले कमिशन हे यापुढे प्रति क्विंटलवर न देता खरेदी व्यवहाराच्या टक्केवारीवर देण्यात यावे असा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

3.3.4 या अभ्यास अहवालाच्या संदर्भात यवतमाळ जिल्हयाचा विचार केला असता यवतमाळ जिल्हयातही ही योजना लागू आहे. सन 1988-89 या आर्थिक वर्षात यवतमाळ जिल्हयात एकूण 21 आदिवासी सहकारी संस्था होत्या व त्यांचेमार्फत साधारणतः 50 ते 55 खरेदी केंद्रामार्फत 2,712 मे.टन इतका माल खरेदी करण्यात आला होता. यापैकी, आदिवासी बांधवांकडून 1,730 मे.टन माल खरेदी करण्यात आला होता.

3.3.5 सन 1992-93 अखेर अस्तित्वात असलेल्या आदिवासी सहकारी संस्थांकडून अशी एकूण 82 केंद्रे माल खरेदीसाठी कार्यरत होती व त्यांनी सन 1992-93 मध्ये 8,423 मे.टन इतका माल खरेदी केला. आदिवासी सहकारी संस्थांच्या पुनर्रचनेपूर्वी व पुनर्रचने नंतरचा तुलनात्मक आढावा घेतला असता एकाधिकार खरेदी योजनेत माल खरेदीमध्ये वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

3.3.6 क्षेत्रीय पहाणीत एकूण 16 संस्थांपैकी 4 संस्थांमध्ये एकाधिकार खरेदी केंद्र आढळून आली असून त्यापैकी 1 केंद्र बंद पडले, तर 2 केंद्रे तोटयात आहेत. तसेच एक केंद्र नफयात असल्याचे आढळून आले. या एकाधिकार खरेदी केंद्र असलेल्या संस्थांना महामंडळाकडून योग्य वेळेत कमिशन मिळत नाही. तसेच ते वाढवून मिळावे अशी विनंतीवजा तक्रार संबंधितांनी केली याचाच अर्थ असा की, अद्यापि कमिशन वाढविण्याबाबतची शासकीय कार्यवाही अपूर्ण असल्याचे निदर्शनास येत आहे. उर्वरित 12 संस्थांपैकी 6 संस्थांनी अशा केंद्रांची मागणी केलेली आहे. 12 ते 13 लाभधारक सभासदांनी ही एकाधिकार खरेदी केंद्रे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले आहे.

3.4 रास्त भावाचे धान्य दुकान व्यवहारात मिळणारे कमिशन वाढवून देणेबाबत :

3.4.1 आदिवासी भागात आदिवासी लोकांची स्थानिक व्यापा-यांकडून फसवणूक होऊ नये म्हणून रास्त भावाचे धान्य दुकान अशा प्रकारची सेवा उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न महामंडळामार्फत चालविले आहेत. खाजगी व्यापा-यांना ज्या अनेक गोष्टी नफा मिळविण्याकरिता करता येतात तसा प्रकार करण्याचा संस्थेचा हेतू नसल्यामुळे व माल विक्रीवर मिळणारे कमिशन हे अल्प असून इतर अनुषंगिक खर्च हे जास्त असल्याने संस्थांना या उपक्रमात फार मोठया प्रमाणात वार्षिक तोटा सहन करावा लागतो. त्यामुळे आदिवासी सहकारी संस्थांना या व्यवहारात कमिशन वाढवून मिळावे असा निर्णय शासनाने घेतला आहे.

3.4.2 यवतमाळ जिल्हयातील क्षेत्रीय पहाणीसाठी निवडलेल्या 16 ही आदिवासी सहकारी संस्थांकडे रास्त भावाची धान्य दुकाने नाहीत असे आढळून आले. सन 1992-93 व 1993-94 च्या अर्थसंकल्पात कमिशन वाढवून देणेबाबत अद्यापि तरतूद करण्यात आलेली नाही. यावरून असे दिसून येते की, याबाबत कार्यवाही झालेली नाही. क्षेत्र पहाणीतील 16 पैकी 9 आदिवासी सहकारी संस्थांनी असे केंद्र हवे म्हणून मागणी केलेली आढळली व काही लाभधारकांनीही अशी केंद्रे असावीत म्हणून मागणी केलेली आहे.

3.5 पुनर्रचित आदिवासी सेवा सहकारी संस्थांना धान्य खरेदी व स्वस्त कापड दुकाने किंवा जीवनोपयोगी वस्तू वितरण हे उपक्रम चालविण्यासाठी प्रति वर्षी अनुदान देणेबाबत :

3.5.1 आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेमार्फत अन्नधान्य व ग्राहकोपयोगी वस्तूंचे वितरण करण्यात येते. हे कर्तव्य पार पाडत असताना अशा संस्थांना नुकसान सोसावे लागते यास्तव या नुकसानीची भरपाई करता यावी या हेतूने प्रतिसंस्था प्रतिवर्षी रुपये 2500/- या दराने व्यवस्थापकीय अनुदान देण्यात येते. विद्यमान आदिवासी सहकारी संस्थांद्वारे चालविण्यात येणारी 141 स्वस्त धान्य दुकाने आहेत. आठव्या पंचवार्षिक योजनेत अशा संस्थांना 10 लाख रुपयांचा नियतव्यय प्रस्तावित केला आहे त्यापैकी 1992-93 मध्ये 1.97 लाख इतका खर्च झाला असून 1993-94 मध्ये 4.46 लाख खर्च अपेक्षित आहे.

3.5.2 यवतमाळ जिल्हयातील ज्या संस्था क्षेत्रीय पहाणीसाठी निवडलेल्या होत्या त्या संस्थांकडे अशा प्रकारचा उपक्रम नाही. परंतु असा उपक्रम मिळणेबाबात 9 संस्थांनी व काही लाभधारकांनी मागणी केलेली आहे.

3.6 पुनर्रचित आदिवासी सेवा सहकारी संस्थांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील इतर उद्योग देणेबाबत :

3.6.1 आदिवासी सेवा सहकारी संस्थांच्या पोट नियमात असलेल्या तरतुदीनुसार तिच्या कार्यक्षेत्रात उपलब्ध असलेली सर्व कामे तिनेच करावयाची आहेत. उदा. दुग्ध व्यवसाय, मजूर कंत्राटदारांची कामे, गहिलगार व्यवसाय इत्यादी.

वरील सर्व प्रकारची कामे आदिवासी सहकारी संस्थांनी हाताळली तर आदिवासी सेवा सहकारी संस्थांचे आर्थिक व्यवहार वाढून त्यांची व पर्यायाने लाभार्थींची आर्थिक परिस्थिती चांगली होण्यास निश्चितच हातभार लागेल.

3.6.2 अ) दुग्ध व्यवसाय :

आदिवासी सेवा सहकारी संस्थांच्या कार्यक्षेत्रात दुग्ध व्यवसायास फार मोठा वाव असून तो उपक्रम हाती घेतल्यास त्यातून आदिवासी सहकारी संस्थांना निश्चितच फायदा होईल. दुग्ध व्यवसाय हाताळण्याची तरतूद ही आदिवासी सहकारी संस्थांच्या पोट नियमात आहे. इतर संस्थांनी आदिवासी सहकारी संस्थांच्या कार्यक्षेत्रात दुग्ध संस्थांची नोंदणी करू नये अशा प्रकारचे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या सहकार व आदिवासी विकास विभागांनी काढले आहे.

3.6.3 यवतमाळ जिल्यात दुग्ध व्यवसाय करणा-या सन 1991-92 मध्ये एकूण 303 दुग्ध संस्था कार्यरत आहेत. ज्या आदिवासी सहकारी संस्थांची क्षेत्रीय पहाणीसाठी निवड करण्यात आली त्या एकाही संस्थांकडून दुग्ध व्यवसायाचा उपक्रम चालविला जात नाही.

3.6.4 ब) मजूर कंत्राटी कामे :

आदिवासी सेवा सहकारी संस्थांच्या कार्यक्षेत्रात असलेल्या भूमिहीन सभासदांना रोजगार उपलब्ध करुन देणे हे संस्थेचे एक उद्दिष्ट आहे. आदिवासी भागात उपलब्ध असलेली मजूर कंत्राटदाराची कामे आदिवासी सहकारी संस्थांना करू दिल्यास संस्थेच्या भूमिहीन सभासदांना रोजगार उपलब्ध होऊ शकेल व संस्थेला देखील उत्पन्नाचे एक साधन निर्माण होईल.

3.6.5 यवतमाळ जिल्ह्यात सन 1991-92 मध्ये 41 मजूर सहकारी संस्था कार्यरत होत्या. आदिवासी सहकारी संस्थांना अशा प्रकारची कामे मिळाली कां ? याबाबत विचारणा केली असता एकाही संस्थेला अशी कामे मिळालेली नाहीत असे निदर्शनास आले.

3·6·6 क) मच्छिमार व्यवसाय :

आदिवासी भागात मच्छिमारी व्यवसायाला फार मोठा वाव असून त्यामुळे ब-याच आदिवासी सभासदांना रोजगार उपलब्ध होऊ शकेल म्हणून आदिवासी सेवा सहकारी संस्था या मच्छिमार संस्था आहेत असे गृहीत धरून मच्छिमार सहकारी संस्थांना ज्या प्रकारचे आर्थिक सहाय्य व सवलती उपलब्ध आहेत त्या आदिवासी सहकारी संस्थांना लागू व्हाव्यात असा निर्णय शासनाने घेतला आहे·

3·6·7 आदिवासी विविध कार्यकारी संस्थांना मत्स्य व्यवसायासाठी रुपये 500 दराने पहिल्या 3 वर्षाकरिता, रुपये 250, चवथ्या व पाचव्या वर्षाकरिता व्यवस्थापकीय अनुदान मंजूर करण्यात येते· या प्रयोजनासाठी आठव्या पंचवार्षिक योजनेत 3 लाखाचा नियतव्यय राखून ठेवलेला आहे·

3·6·8 यवतमाळ जिल्हयामध्ये एकूण 81 मच्छिमार संस्था (सन 1991-92 अखेर) कार्यरत आहेत· क्षेत्रीय पहाणीच्या वेळेस 16 पैकी एकाही आदिवासी सहकारी संस्थांनी अशा प्रकारचा उपक्रम चालविलेला आढळून आलेला नाही·

थोडक्यात आदिवासींना उपयुक्त असे वरील तिन्ही उपक्रम आदिवासी सहकारी संस्थांकडून चालविले जात नाहीत· परंतु या सर्व संस्थांनी असे उपक्रम चालवावयास मिळणेबाबत मागणी केलेली आहे, काही लाभधारकांनीही असे उपक्रम हवे असल्याचे नमूद केले आहे·

3·7 पुनर्रचित आदिवासी सेवा सहकारी संस्थांना व्यवस्थापकीय अनुदान देणेबाबत:

3·7·1 पुनर्रचित आदिवासी सेवा सहकारी संस्थेला शेतीसाठी कर्जपुरवठा, एकाधिकार धान्य खरेदी व स्वस्त धान्य दुकान हे तीन उपक्रम हाती घ्यावे लागतील व त्याकरिता संस्थेला स्वतंत्र कर्मचारी वर्ग नेमावा लागेल· ब-याच आदिवासी सहकारी संस्थांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखीची आहे ब-याच आदिवासी सहकारी संस्थांना होत असणा-या तोटयामुळे कर्मचा-यांचे मासिक पगार व संस्थेचे कार्य चालविणे कठीण होत आहे· अशा परिस्थितीत पुनर्रचित आदिवासी सहकारी संस्थांना चांगल्या रितीने कामकाज करता यावे या दृष्टिकोनातून व्यवस्थापकीय अनुदान देणे गरजेचे आहे· व्यवस्थापकीय अनुदानामुळे संस्थेचे कामकाज सुरळीतपणे व कार्यक्षम रितीने चालतील हा हेतू लक्षात घेवून शासनाने पुनर्रचित होणा-या आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थांना जास्तीत जास्त 5 वर्षासाठी 100 टक्के व्यवस्थापकीय अनुदान देण्यास मान्यता दिली·

3·7·2 व्यवस्थापनावरील अंदाजित वाढीव खर्च प्रतिसंस्था प्रतिवर्षी रुपये 30,000 राहील असा अंदाज आहे· सबब सदर अतिरिक्त खर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठी आणि संस्था ना

नफा ना तोटा या तत्वावर चालविण्यासाठी प्रत्येक संस्थेला रुपये 30,000 या दराने किंवा व्यवस्थापनावरील प्रत्यक्ष खर्चामुळे मागील वर्षातील झालेले नुकसान जी रक्कम कमी असेल तितके व्यवस्थापन अनुदान दिले जात आहे. अशा संस्थांना अर्थसहाय्य देण्याबद्दलची पध्दती अद्याप शासनाच्या विचाराधीन आहे. आठव्या पंचवार्षिक योजनेत याकरिता रु. 1200 लाख इतका नियतव्यय निर्धारित केलेला आहे. साधारणतः आठव्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या दोन वर्षात 284 लाख इतके अनुदान खर्ची झाल्याचे दिसून येत आहे.

3.7.3 यवतमाळ जिल्हयातील पहाणीसाठी निवडलेल्या 16 आदिवासी सहकारी संस्थांना त्यांच्या पुनर्रचनेनंतर रु.10,000 इतके व्यवस्थापकीय अनुदान सन 1991-92 ते 1993-94 करिता प्रत्येक वर्षास मिळाल्याचे दिसून आले आहे.

3.8 क्षेत्रीय पहाणीत आदिवासी सहकारी संस्थांबाबत आढळलेल्या इतर बाबी :

3.8.1 यवतमाळ जिल्हयातील पहाणीसाठी निवडलेल्या 16 पैकी 15 आदिवासी सहकारी संस्थांकडे संस्थेच्या स्वतःच्या मालकीची इमारत नाही. तसेच भाडयाची सुध्दा इमारत नाही. संस्थेचे सर्व दप्तर हे संस्थेच्या व्यवस्थापकांच्या निवासस्थानी असतेअसे आढळून आले आहे.

3.8.2 आदिवासी सहकारी संस्थेच्या पुनर्रचनेनंतर संस्थेला इतर उपक्रम राबविण्यासाठी अतिरिक्त कर्मचा-यांची नेमणूक करावी लागेल या हेतूने शासनाने त्यांना व्यवस्थापकीय अनुदान दिले आहे. परंतु यवतमाळ जिल्हयातील पहाणीसाठी निवडलेल्या 16 संस्थांपैकी एकाही संस्थेकडे व्यवस्थापका (सचिव) व्यतिरिक्त अतिरिक्त कर्मचारी आढळले नाहीत.

3.8.3 आदिवासी सहकारी संस्थांचा कारभार पहाण्यासाठी जे व्यवस्थापक (सचिव) नेमले आहेत त्यांना दरमहा फक्त रु.500 वेतन मिळते व ते वेळेवर मिळत नाही असे त्यांचे प्रतिपादन आहे.

3.8.4 यवतमाळ जिल्हयातील क्षेत्रीय पहाणीसाठी निवडलेल्या 16 संस्थांमध्ये 51 टक्के आदिवासी व 49 टक्के बिगर आदिवासी सभासदांचे प्रमाण आढळले.

3.8.5 पहाणीसाठी निवडलेल्या आदिवासी सहकारी संस्था हया माडा, मिनी माडा व अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात असल्याने सभासदांना संस्थेमार्फत खावटी कर्ज वाटप केले जात नाही.

3.8.6 यवतमाळ जिल्हयात 80 टक्के शेती हा उद्योग आहे. पहाणीसाठी निवडलेल्या आदिवासी सहकारी संस्थांच्या कार्यक्षेत्रातील सभासद बहुतांश शेतकरी आहेत. त्यांना आदिवासी सहकारी संस्थेमार्फत बी-बियाणे, खते, शेती अवजारे पुरविली जात नाहीत असे आढळून आले.

3·8·7 पहाणीसाठी निवडलेल्या यवतमाळ जिल्हयातील आदिवासी सहकारी संस्थांकडील एकही प्रतिनिधी आदिवासी विकास महामंडळ, जिल्हा बँकेच्या समितीवर नियुक्त असलेला आढळलेला नाही·

3·8·8 यवतमाळ जिल्हयातील आदिवासी सहकारी संस्था नफा/तोटयात आहे कां ? असा प्रश्न व्यवस्थापकांना विचारला असता त्याबाबत ठामपणे उत्तर मिळाले नाही· परंतु जिल्हा निबंधकांकडून प्राप्त माहितीनुसार सर्व संस्थांना 92-93 मध्ये "क" वर्ग प्राप्त झाला आहे·

3·8·9 यवतमाळ जिल्हयातील पहाणीसाठी निवडलेल्या 16 संस्थांपैकी 5 संस्थांचे भाग भांडवल 50 हजारापेक्षा कमी 11 संस्थांचे भाग भांडवल 50 हजार ते 1 लाखापर्यंत आढळले·

3·8·10 पहाणीसाठी निवडलेल्या संस्थांकडून शेतीस पाणी पुरवठा, मध्यम व दीर्घ मुदतीची कर्जे शासनामार्फत मिळावीत· सचिवांना वेतन वाढवून मिळावे, खावटी कर्ज योजना लागू करावी, खते, बी-बियाणे वाटप उपक्रम संस्थेस मिळावा अशा स्वरुपाच्या मागण्या केल्या आहेत·

## 3·9 क्षेत्रीय पहाणीत आदिवासी सहकारी संस्थांच्या लाभधारक कुटुंबाबाबत आढळलेल्या बाबी :

3·9·1 यवतमाळ जिल्हयातील पहाणीसाठी निवडलेल्या एकूण 72 कुटुंबापैकी 64 टक्के कुटुंबे साक्षर आहेत· या एकूण 72 कुटुंबांपैकी 69 कुटुंबांचा शेतीचा व्यवसाय असून त्यापैकी फक्त 12 कुटुंबे दुय्यम व्यवसाय करताना आढळून आलीत· 3 कुटुंबांचा मुख्य व्यवसाय मजूरी आहे व त्यांच्याकडे शेती नाही· शेती व्यवसाय करणा-या 69 कुटुंबापैकी 12 कुटुंबांकडे बागायती व जिरायती पध्दतीची तर 57 कुटुंबाकडे फक्त जिरायती पध्दतीची शेती आहे· शेतीच्या क्षेत्राचा विचार केला तर -

1· 1 हेक्टर पेक्षा कमी क्षेत्र = 15 लाभधारक (शेती व्यवसाय करणारे कुटुंब)
2· 1 ते 5 हेक्टर क्षेत्र = 38 -"-
3· 5 हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्र = 16 -"-
------
69 -"-
------

आढळून आले असून या 69 कुटुंबांपैकी 64 लाभधारक कुटुंबांनी अल्पमुदत कर्जाचा फायदा घेतला आहे· बी-बियाणे, खते, शेती अवजारे, शेतीस पाणी पुरवठा योजना, मध्यम मुदतीची कर्जे, बैलजोडी आदिवासी सहकारी संस्थेमार्फत उपलब्ध होणेबाबत त्यांनी मागणी केली आहे· या सर्व 72 लाभार्थीपैकी 64 टक्के लाभार्थीचा सभासद कार्यकाल 5 वर्षापेक्षा कमी असून 36

टक्के लाभार्थींचा सभासद कार्यकाल हा 5 वर्षापेक्षा जास्त आहे.

3.10 पुनर्रचित आदिवासी सहकारी संस्थेविषयी सहाय्यक निबंधक यवतमाळ व सहकार अधिकारी, प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळ यांची मते :

3.10.1 पुनर्रचित आदिवासी सहकारी संस्था पूर्वी कृषि पतपुरवठा करीत असत. या व्यतिरिक्त कोणतेही तसे खास व्यवहार करीत नव्हत्या. संस्थांचे कार्यक्षेत्र मोठया प्रमाणात असल्यामुळे संस्थेचे कर्मचारी प्रत्यक्ष कर्ज वसुलीसाठी जावू शकत नव्हते. त्यामुळे थकबाकीचे प्रमाण जास्त असे. सभासदांनाही कर्ज मागणीकरीता जाणेबाबत अडचणीचे वाटत असे. थकबाकीमुळे व्याजाचे प्रमाण वाढल्याने संस्था तोटयात जावू लागल्या.

3.10.2 आदिवासी सहकारी संस्थांच्या पुनर्रचनेनंतर सभासदांना कर्ज पुरवठा वेळेवर होतो. सभासदांच्या काही अडचणी असल्यास त्या सोडविता येतात. परंतु, एकाही संस्थेने इतर उपक्रम चालविणेबाबत प्रयत्न केलेले नाहीत. संस्थेचे कर्ज व इतर व्यवहार वाढल्यास संस्था नफयात येतील अशी ही आशा व्यक्त करण्यात आली.

3.10.3 पुनर्रचित संस्थेच्या कामकाजात काही बदल सुचविण्याबाबत विचारले असता, संस्थांच्या सध्याच्या कार्यपध्दतीत बदल करण्याची आवश्यकता नाही. परंतु आवश्यकता आहे तिथे जादा कर्मचाऱ्यांची नेमणूक करणे, सचिवांचे पगार निश्चित करणे, असेही मत व्यक्त केले.

3.10.4 आदिवासी सहकारी संस्था अधिक कार्यक्षम करण्यासाठी संस्थेने अनेक उपक्रम चालविणे आवश्यक आहे. सभासदांच्या गरजा लक्षात घेवून कार्य करणे आवश्यक आहे. आर्थिक मदत शासनाकडून देणे आवश्यक आहे. संस्थांच्या सुधारणांकरिता त्यांच्यावर कोणत्यातरी एजन्सीचे पूर्ण नियंत्रण असणे आवश्यक आहे, त्याशिवाय संस्थेच्या कामकाजात सुसूत्रता येणार नाही असे त्यांनी मत व्यक्त केले.

3.10.5 यवतमाळ जिल्हयातील सर्व पुनर्रचित आदिवासी सहकारी संस्थांचे सन 1992-93 पर्यंतचे लेखा परिक्षण झालेले असून त्यांना "क" वर्ग प्राप्त झाला आहे असे जिल्हा निबंधकांनी कळविले आहे.

....

## प्रकरण 4 थे

----------

## पहाणीतील निष्कर्ष व शिफारशी

----------------------

4·1 आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र·एसीएस-1084/41973/प्र·क्र·1534/का-4, दिनांक 24 एप्रिल 1990 अन्वये महाराष्ट्र शासनाने, महाराष्ट्र राज्यातील आदिवासी सेवा सहकारी संस्थांची पुनर्रचना केली· या आदेशान्वये संस्थांच्या एकाधिकार खरेदी व्यवहारात कमिशन वाढवून देणे, स्वस्त धान्य दुकानांकरिता अनुदान देणे, इतर उद्योग धंदयांच्या सहाय्याने आदिवासी सहकारी संस्थांचे आर्थिक मजबुतीकरण करणे इत्यादी स्वरूपाचे निर्णय शासनाने घेतले· सदर निर्णयानंतर साधारण 2 ते 3 वर्षांनी या निर्णयाची अंमलबजावणी कशाप्रकारे झाली याकरिता यवतमाळ जिल्हयातील 16 पुनर्रचित आदिवासी सहकारी संस्थांची क्षेत्रीय पहाणी या संस्थेमार्फत घेण्यात आली· या पुनर्रचित आदिवासी संस्थांची क्षेत्रीय पहाणी शासन निर्णयाचा परिणाम अजमाविण्याच्या हेतूने घेण्यात आलेली असून त्याची सविस्तर चर्चा प्रकरण-3 मध्ये करण्यात आली आहे· या अनुषंगाने करावयाच्या शिफारशीवजा सूचनांचा उहापोह खाली केलेला आहे·

4·2 शासन निर्णयातील पहिली महत्वाची बाब म्हणजे "आदिवासी सेवा सहकारी संस्थांची पुनर्रचना करणे" ही होय· या निर्णयाची अंमलबजावणी तातडीने करण्यात आली· आदिवासी सेवा सहकारी संस्था हया "आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था" म्हणून ओळखल्या जावू लागल्या· पुनर्रचित आदिवासी सहकारी संस्थांच्या कार्यक्षेत्रात जवळील व कमी गावांचा समावेश करण्यात येवून एका आदिवासी सहकारी संस्थेमागे जास्तीत जास्त 5000 इतकी आदिवासी लोकसंख्या सिमित ठेवण्यात आली· संस्थांच्या पुनर्रचनेचा शासनाचा निर्णय खरोखरच चांगला असल्याचे निदर्शनास आले· पुनर्रचनेमुळे "फायदा" झाला असे 71 टक्के लाभधारकांनी सांगितल्याचे आढळून आले· पुनर्रचित आदिवासी सहकारी संस्थांच्या निर्मितीमुळे सभासदांची कर्ज प्रकरणे लवकर निकालात निघाली· तसेच कर्ज प्रकरण अथवा इतर सुविधांसाठी सभासदांना खूप दूरवरचे अंतर कापावे लागते आणि त्यामुळे त्याचा संपूर्ण दिवस वाया जात असे· पुनर्रचनेमुळे आता त्यांचे कामाचे दिवस वाया जात नाहीत· लाभधारकांच्या पहाणीमध्ये "शेती" हा व्यवसाय असलेली 72 पैकी 69 कुटुंबे आढळली· बैल व बैलगाडी, खते, बी-बियाणे, विद्युत पंप व कर्जे हया त्यांच्या मागण्या आदिवासी सहकारी संस्थांनी पुरवाव्यात अशी त्यांची इच्छा आहे· हया त्यांच्या मागण्या पुनर्रचित आदिवासी सहकारी संस्थांना आदिवासी विकास महामंडळ व स्थानिक बँकांच्या मदतीने पूर्ण करता येणे शक्य आहे व त्यामुळे संस्थेची पत वाढून संस्था कार्यक्षम होण्यास मदत होईल· यवतमाळ जिल्हयातील पहाणीत असे आढळले की, एकाही संस्थेने अशा प्रकारचे व्यवहार केलेले नाहीत व या संस्थांचा कारभार पहाता त्या लाभधारकांच्या हया मागण्या पूर्ण करण्यास असमर्थ ठरत असल्याचे निदर्शनास आले· यामध्ये सभासदांकडेसुध्दा याचा दोष जात आहे· जर सभासद जागृत नसतील तर संस्थांच्या कारभारात एकसूत्रता रहात नाही, संस्थांचे कारभार मनमानी चालतात, संस्थांकडून इतर व्यवहार चालविले जात नाहीत व पर्यायाने

संस्थांचे व त्यांच्या सभासदांचे नुकसान होऊन त्याची शासनास किंमत मोजावी लागते.

4.3 पुनर्रचित आदिवासी सहकारी संस्थांना स्वतःची अथवा भाड्याची इमारत नाही. क्षेत्रीय पहाणीसाठी निवडलेल्या पुनर्रचित आदिवासी सहकारी संस्थांकडे पुरेसा कर्मचारी वर्ग नाही. एक सचिव (व्यवस्थापक) आहे. त्याच्याकडेच संस्थेचे दप्तर असते. सचिव व ती संस्था या पुरतेच संस्थेचे कार्य सिमित आहे असे आढळून आले. संस्थांचा कारभार चांगला चालविण्यासाठी शासनाने आर्थिक मदत द्यावी, तसेच सचिवांना शासनाने शासकीय नोकरांप्रमाणे पगार द्यावा त्यामुळे संस्था चांगल्याप्रकारे काम करील असे ब-याच सभासदांना वाटते. त्यांचे म्हणणे खरे ही आहे, परंतु त्याकरिता या सहकारी संस्थांनी त्यांची कार्यक्षमता शासनाच्या नजरेस आणून देणे आवश्यक आहे. आर्थिक उलाढाल दाखवून या आदिवासी सहकारी संस्था रोजगार निर्मितीमध्ये शासनास मदत करीत आहेत असे जेव्हां निदर्शनास येईल त्यावेळी त्यांना शासन मदत करेल. आतासुध्दा विविध कल्याणकारी निर्णयातून शासनाची सहकार्याचीच भावना दिसून येत आहे. आपला स्वतःचा व्यवसाय सांभाळणे, व्यवसायातील अडचणी सामुहिकरित्या दूर करणे, एकमेकांना मदत करणे, रोजगार निर्माण करणे, व्यवसाय वृध्दींगत करणे, सामाजिक एकता व शांतता नांदेल याकडे लक्ष देण्याचे काम सभासद व संस्था या दोघांनी मिळून करणे आवश्यक आहे आणि त्यामुळे सहकार चळवळ बदनाम होणार नाही. त्याकरिता सभासद जागृत हवे असे वाटते.

4.4 यवतमाळ जिल्हयातील एकूण 92 आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थांचे लेखा परिक्षण झालेले असून त्यांना "क" वर्ग प्राप्त झालेला आहे. यामध्ये पहाणीसाठी निवडलेल्या 16 आदिवासी संस्थांचाही समावेश आहे. या "क" वर्गावरून संस्थांचे आर्थिक व्यवहार साधारण स्वरूपाचे असल्याचे आढळून येत आहे.

4.5 आदिवासी सहकारी संस्थांवर आदिवासी विकास महामंडळाचे खास असे नियंत्रण नाही. एखाद्या एजन्सीचे नियंत्रण हवे असे सहनिबंधक, पांढरकवडा यांचे मत आहे. संस्था कार्यप्रणाली बाबत व्यवस्थापकांना मार्गदर्शन झालेले असेल तर त्याचा वापर झालेला नाही असे म्हणावे लागेल.

4.6 एकाधिकार खरेदीमध्ये कमिशन वाढवून देणे या शासनाच्या निर्णयाबाबत क्षेत्रीय पहाणीमध्ये 16 पैकी फक्त 4 संस्थांकडेच अशी एकाधिकार खरेदी केंद्रे आढळून आलेली आहेत. त्यामध्ये त्यांना कमिशन वाढवून मिळालेले नाही. याबाबतचा स्वतंत्र शासन निर्णय अद्यापि निर्गमित झालेला नाही. आदिवासी विकास महामंडळाचा एकाधिकार खरेदीचा उपक्रम खरोखरच स्तुत्यप्रिय आहे. आदिवासींची पिळवणूक या उपक्रमामुळे थांबली गेली कारण बडे व्यापारी/व्यावसायिक आणि सावकार आदिवासींकडून चांगला माल कमी किंमतीत खरेदी करत व हलक्या प्रतीचा माल जास्त किंमत लावून विकत असत. आदिवासी विकास महामंडळाच्या या उपक्रमामुळे आदिवासींना संरक्षण मिळाले. महामंडळाच्या वार्षिक अहवालातील आकडेवारी पाहिली असता या उपक्रमास चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येत आहे. सभासदांकडील माल खरेदी करणे, त्यांची साठवणूक करणे व त्यानंतर त्या मालाची विक्री करणे यावर जे कमिशन

मिळते ते पुनर्रचित आदिवासी सहकारी संस्थांच्या मालकीचे असते. त्यामुळे संस्थांना आपला खर्च भागविण्यास मदत होते. यवतमाळ जिल्हयात पहाणीसाठी निवडलेल्या 16 संस्थांपैकी 4 संस्थांकडे अशी केंद्रे असून उर्वरित 12 पैकी 6 संस्थांनी अशी एकाधिकार खरेदी केंद्रे चालविण्यास मिळणेबाबत मागणी केलेली आहे. पहाणीतील लाभधारक सभासदांचीसुध्दा अशीच मागणी आहे. याबाबतची निकड आदिवासी विकास महामंडळाच्या लक्षात आणून देणेकरिता पुनर्रचित आदिवासी सहकारी संस्थांना आपल्या कार्यक्षमतेची आणि मालाच्या खरेदी-विक्री व्यवहाराच्या उलाढालीची चुणूक महामंडळास दाखवून द्यावी लागेल. पुनर्रचित आदिवासी सहकारी संस्थांनी हा उपक्रम चालविण्याबाबत निर्धार केल्यास आणि व्यवस्थापक व लाभधारक सभासद यांनी याबाबत गांभिर्याने विचार केल्यास असा उपक्रम ते राबवू शकतील असे वाटते. ह्या उपक्रमामुळे आदिवासी सहकारी संस्थांना तोटे येण्याची शक्यता आहे हे गृहीत धरून शासनाने "कमिशन" वाढविण्याबाबत सहमती दर्शविली आहे. गरजू आदिवासी सहकारी संस्थांनीसुध्दा कमिशन वाढीबाबत शासनाकडे पाठपुरावा करावा असे वाटते.

4.7 "रास्त भाव धान्य दुकान" या उपक्रमात कमिशन वाढविणेबाबत शासनाने निर्णय घेतला आहे. यवतमाळ जिल्हयातील पहाणीसाठी निवडलेल्या 16 पुनर्रचित आदिवासी सहकारी संस्थांकडे "रास्त भाव धान्य दुकाने" आढळलेली नाहीत. या 16 आदिवासी सहकारी संस्थांपैकी 9 संस्थांनी अशा दुकानांची मागणी केलेली आहे. संस्थांच्या हालाखीचा कारभार पहाता त्यांना हा उपक्रम मंजूर होईल याची शाश्वती वाटत नाही. शासनाने कमिशन वाढवून देणेबाबत निर्णय घेतला असला तरी अर्थसंकल्पात अशा प्रकारची तरतूद केल्याचे आढळून आलेले नाही.

4.8 अन्नधान्य, कापड व ग्राहकोपयोगी वस्तूंचे वितरण हा उपक्रमसुध्दा सभासदांच्या दररोजच्या गरजा भागविणारा आहे. ह्या उपक्रमांमुळे पुनर्रचित आदिवासी सहकारी संस्थांची आर्थिक परिस्थिती सुधारू शकेल व त्यामुळे रोजगार निर्मिती होईल. या उपक्रमामध्ये कायम नफाच होईल याची शक्यता नाही तर तोटाच होण्याची शक्यता धरून शासनाने आदिवासी सहकारी संस्थांच्या नुकसान भरपाईकरिता त्यांना अनुदान देण्याचा निर्णय घेतला आणि त्याप्रमाणे अर्थसंकल्पात आर्थिक तरतूद करण्यात आली. त्यापैकी काही रक्कम खर्चीही पडल्याचे दिसून आले. यवतमाळ जिल्हयात पहाणीसाठी निवडलेल्या 16 पुनर्रचित आदिवासी सहकारी संस्थांकडून असे उपक्रम (व्यवहार) चालविलेले जात नाहीत. ,परंतु असे उपक्रम चालविण्यासाठीची मागणी 9 संस्थांनी केली आहे. हे उपक्रम आदिवासी सहकारी संस्था स्वबळावर करू शकल्या असत्या परंतु पहाणीच्या वेळेचे याबाबतचे ऐकीव अनुभव चांगले नसल्याचे निदर्शनास आले आहेत. पुनर्रचनेपूर्वी काही आदिवासी सेवा सहकारी संस्थांकडून असे उपक्रम चालविले जात होते, परंतु पूर्वीच्या या व्यवहारात तोटा आल्यामुळे पुनर्रचित संस्थांनी असे व्यवहार ताब्यात घेतले नाही असे एक दोन संस्थांच्या बाबत आढळून आले आहे.

4.9 16 पैकी 12 पुनर्रचित आदिवासी सहकारी संस्था ह्या पीक कर्जा व्यतिरिक्त काहीच व्यवहार करीत नसल्याचे या पहाणीमध्ये आढळून आले. या पुनर्रचित आदिवासी सहकारी संस्थांचे आर्थिक व्यवहार चांगले चालावेत, बिगर शेती सभासदांना इतर व्यवसायाच्या मदतीने कसा

रोजगार उपलब्ध होईल हा विचार नजरेसमोर ठेवून महाराष्ट्र शासनाने दुग्ध व्यवसाय, मत्स्य व्यवसाय व मजूर कंत्राटी कामे आदिवासी सहकारी संस्थांनाच मिळतील असा निर्णय घेतला, व संबंधितांना त्याच्या अंमलबजावणीची कार्यवाही करणेसाठी सूचना दिल्या. इतर बिगर आदिवासी संस्थांची त्या क्षेत्रात नोंदणी करू नये व त्या त्या व्यवसायातीलच आदिवासी सहकारी संस्था ही एक संस्था आहे असे समजून तसे व्यवहार त्यांनाच हाताळावयास द्यावेत हा शासन निर्णय आदिवासींचे कल्याण हितार्थ निर्गमित केला असून त्यामागची शासनाची सकारात्मक भूमिकाही स्पष्ट होत आहे. अशा चांगल्या निर्णयाचा लाभ घेण्याबाबत मात्र यवतमाळ जिल्हयातील संस्था अपयशी ठरल्या. एकाही संस्थेकडून असे उपक्रम चालविल्याचे आढळून आले नाही. मत्स्य व्यवसाय या उपक्रमासाठी महाराष्ट्र शासन व्यवस्थापकीय अनुदानही देते. परंतु या पुनर्रचित संस्थांनी याचा लाभ उठविला नाही.

4.10 पुनर्रचित आदिवासी सहकारी संस्थांना स्वस्त धान्य दुकान, खरेदी विक्री व्यवहार, कापड दुकान, गृहोपयोगी वस्तूंचे वितरण व इतर मत्स्य व्यवसाय, दुग्ध व्यवसाय आणि मजूर कंत्राटी कामे इत्यादी व्यवहार सांभाळण्यासाठी किंवा उपक्रम चालविण्यासाठी अतिरिक्त कर्मचा-यांची आवश्यकता आहे. हे उपक्रम चालविताना तोटा येण्याची शक्यता असते. संस्था आर्थिक तोट्यामुळे डबघाईस जावून नये आणि पर्यायाने सभासदांचे आर्थिक नुकसान होऊ नये म्हणून अशा संस्थांचा तोटा लक्षात घेवून त्यांना "व्यवस्थापकीय अनुदान" देण्याचा निर्णय शासनाने घेतला, आणि त्यानुसार अर्थसंकल्पात तरतूद केली. यामध्ये संस्था टिकविणे आणि आदिवासी सभासदांचे नुकसान टाळणे पर्यायाने आदिवासींना संरक्षण देणे हा यामागील शासनाचा हेतू स्पष्ट होतो. शासनाचा हा सकारात्मक निर्णय वाखाणण्याजोगा आहे. ब-याच संस्थांना हा निर्णय लाभदायी ठरेल यात शंका नाही. या व्यवस्थापकीय अनुदानाचा योग्य वापर केल्यास आदिवासी सहकारी संस्था आपला कारभार चांगल्या प्रकारे चालवू शकतील. यवतमाळ जिल्हयातील पहाणीसाठी निवडलेल्या पुनर्रचित आदिवासी सहकारी संस्थांना पुनर्रचनेनंतर "व्यवस्थापकीय अनुदान" मिळाल्याचे आढळून आले. परंतु या संस्थांकडून काहीही व्यवहार चालविले जात नसल्याने शासनाचा हेतू साध्य झालेला नाही. येथून पुढेही या संस्थांनी एखादा जरी व्यवहार हाताळला तरी शासनाच्या निर्णयाचे सार्थक झाल्याचे दिसेल व त्यामुळे भूमिहीन सभासदांना रोजगार उपलब्ध होईल.

4.11 वरील शासन निर्णयांव्यतिरिक्त क्षेत्रीय पहाणीत आढळलेल्या पुनर्रचित आदिवासी सहकारी संस्थांच्या कार्यपध्दती बाबतच्या अन्य बाबींवर नजर टाकल्यास यवतमाळ जिल्हयातील आदिवासी सहकारी संस्थांची स्थिती निदर्शनास येईल. या पहाणीसाठी निवडलेल्या पुनर्रचित सहकारी संस्थांमध्ये 51 टक्के आदिवासी लाभार्थी असल्याचे आढळले. पुनर्रचनेनंतर सभासदांच्या संख्येत वाढ झाल्याचे आढळले. सभासदांची वाढती संख्या पहाता आदिवासी सहकारी संस्थांची सभासदांना गरज असल्याचे निदर्शनास आले. या पुनर्रचित आदिवासी सहकारी संस्था अतिरिक्त आदिवासी उपयोजना, माडा व मिनी माडा क्षेत्रात असल्याने त्यांना "खावटी कर्ज" उपलब्ध होत नाही. परंतु ते त्यांना मिळावेत अशी लाभधारक सभासदांची मागणी आहे. पुनर्रचित संस्था सभासद कुटुंबाचे एकूण साक्षरतेचे प्रमाण 64 टक्के आहे. सभासदांचा शेती हा मुख्य व्यवसाय

असून त्यातील 57 कुटुंबे जिरायती शेती करतात. मुख्य व्यवसाय शेती असल्यानेशेती अवजारे, खते, बी-बियाणे, विद्युत पंप, मध्यम व दिर्घ कर्जे यांची मागणी लाभधारकांकडून होणे साहजिकच आहे. अल्प मुदतीची कर्जे सर्व शेतकरी लाभधारकांनी जिल्हा सहकारी बँकाकडून/राष्ट्रीयकृत बँकाकडून घेतल्याचे आढळून आले. पुनर्रचित आदिवासी सहकारी संस्थांचा ढाचा योग्य आहे. त्यामध्ये बदल करण्याची आवश्यकता नाही असे सहाय्यक निबंधक यांनी सुचविले आहे. पुनर्रचित आदिवासी सहकारी संस्थांचे आर्थिक व्यवहार चांगले चालण्यासाठी संस्थांनी इतर उद्योगधंदे/व्यवहार चालविणे आवश्यक आहे आणि या आदिवासी सहकारी संस्थांवर नियंत्रणही आवश्यक आहे असेही त्यांनी सुचविले आहे.

4.12 थोडक्यात "शेती" हा मुख्य व्यवसाय आहे, सिंचन सुविधा आहे, साक्षरतेचे प्रमाण चांगले आहे. दळणवळणाची सोय आहे. शासनाच्या अनेक योजना कार्यान्वित आहेत. असे असूनसुध्दा यवतमाळ जिल्ह्यातील या पुनर्रचित आदिवासी सहकारी संस्था इतर कोणताही व्यवहार करीत नसल्यामुळे आर्थिकदृष्ट्या कमकुवत आहेत. त्यांचा कारभार एकखांबी तंबूसारखा आहे. सभासदांमध्ये सहकारी संस्थांविषयी जागृततेचा अभाव आहे. आदिवासी सहकारी संस्थांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी शासनाने थकबाकीदारांना व्याज माफ करणे, व्यवस्थापकीय अनुदान देणे, इतर व्यवहारात आर्थिक सोयी सवलती दिलेल्या आहेत याचा या संस्थांनी फायदा करून घेतलेला नाही. आदिवासी विकास महामंडळाने जादा लक्ष पुरविणे आवश्यक आहे. त्यांनी त्यांच्या अडचणी समजून घेणे आवश्यक आहे. पुनर्रचित आदिवासी सहकारी संस्थांना सभासदांच्या हितासाठी चांगले निर्णय घेण्यास वाव आहे व त्यादृष्टीने त्यांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

4.13 पुनर्रचित आदिवासी सहकारी संस्थांच्या मजबुतीकरण व आर्थिक बळकटीकरणासाठी खालील सूचनांचा संबंधितांनी विचार करणे गरजेचे ठरेल असे वाटते.

4.13.1 सहकार क्षेत्रात अनेक तज्ञ, जाणकार व प्रशिक्षित कार्यकर्ते आणि पदाधिकारी आहेत. त्यांच्या अनुभवाचा फायदा पुनर्रचित आदिवासी सहकारी संस्थांच्या व्यवस्थापकांना/कर्मचाऱ्यांना करून देणे गरजेचे वाटते. संस्थांचे व्यवस्थापन, आदिवासींच्या मालाचे खरेदी-विक्रीचे व्यवहार, माल साठवणूक, इतर उद्योग धंदयांची माहिती व प्रशिक्षण, कर्ज प्रकरणे हाताळण्याची कला, कर्ज वसुलींच्या पध्दती, महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या शासकीय योजनांची माहिती, आदिवासींना असलेल्या शासकीय सवलती इत्यादी माहितीचा त्यामध्ये समावेश असावा असे वाटते. प्रशिक्षणासाठी "आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे" मार्गदर्शन घेता येणे शक्य आहे.

4.13.2 आदिवासी भागामध्ये साक्षरतेचे प्रमाण वाढत चालले आहे. संस्था व्यवस्थापक किंवा सचिव सुशिक्षित पदवीधर असेल तर त्याच्या शिक्षणाचा फायदा संस्थेला होईल. त्याकरिता संस्था व्यवस्थापक किंवा सचिव पदी सुशिक्षित उमेदवाराची नियुक्ती करावी. असा उमेदवार शक्यतो स्थानिक असावा आणि त्यास नोकरीची हमी असावी.

4.13.3 पुनर्रचित आदिवासी सहकारी संस्थांवर सध्या महामंडळाचे नियंत्रण आहे. परंतु

आदिवासी विकास महामंडळाकडील विशाल कार्यभाराचा विचार करता त्यांना ते शक्य होत नाही असे दिसते व त्याकरिता वेगळ्या उपाय योजनेची आवश्यकता आहे. महाराष्ट्रामध्ये दुग्ध व्यवसायाच्या विविध सहकारी संस्थांचा "संघ" तयार करण्यात आलेला आहे. हा "संघ" तालुका/जिल्हा पातळीवर कार्यरत आहे. त्याच धर्तीवर आदिवासी सहकारी संस्थांचा तालुका/आदिवासी प्रकल्प निहाय/जिल्हा अथवा प्रादेशिक स्तरावर "संघ" (फेडरेशन) तयार करून या संघाद्वारे नियंत्रण ठेवणे शक्य आहे.

4.13.4 एखाद्या जिल्ह्यात/तालुक्यामध्ये आदिवासी सहकारी संख्या कमी असेल तर आदिवासी जंगल कामगार संस्था, आदिवासी दुग्ध संस्था किंवा इतर व्यवहार करणाऱ्या आदिवासी सहकारी संस्था यांचाही या संघामध्ये समावेश करता येईल. त्यामुळे संघाची रचना बळकट होऊन त्या त्या विविध संस्थांच्या कामकाजाचा अनुभव आदिवासी सहकारी संस्थांना अथवा एकमेकांना होईल. खरेदी विक्री व्यवहार, कर्ज प्रकरणे, पणन विषयक माहिती, व्यवस्थापन, इतर पूरक उद्योग धंदयांचे मार्गदर्शन इत्यादी बाबींबाबत "संघ" या संस्थांना मार्गदर्शन करू शकेल. आदिवासी सहकारी संस्थांचे आर्थिक हित संघाकडून सांभाळले जाईल.

4.13.5 आदिवासींकरिता आदिवासी विकास महामंडळामार्फत राबविली जाणारी एकाधिकार खरेदी योजना खरोखरच लाभदायक आहे. " खरेदी केंद्र" विस्ताराबाबत महामंडळाने आवश्यक तो विचार करून जेथे खरेदी केंद्र चांगल्या प्रकारे चालविले जाणार आहेत त्यांना उपलब्ध करून द्यावीत. आदिवासी सहकारी संस्थांना या व्यवहाराच्या मोबदल्यात कमिशन वाढवून देण्याबाबत शासनाने तत्काळ कार्यवाही करावी असे वाटते तसेच रोख व त्वरीत मोबदला लाभधारक सभासदांना मिळेल याकडे महामंडळाने लक्ष पुरवावे. हे केंद्र चालविताना का तोटा येतो याची कारणे शोधून ती दूर करण्याविषयी महामंडळाने लक्ष पुरविणे आवश्यक आहे.

4.13.6 पुनर्रचित आदिवासी सहकारी संस्थांनी आदिवासी विकास महामंडळ अथवा स्थानिक बँकांच्या मदतीने आपल्या सभासदांना शेती विषयक अवजारे, खते, बी-बियाणे, बैलजोडी, बैलगाडी, विद्युत पंप व इतर उद्योगांसाठी भांडवल पुरविणे आवश्यक आहे. "कमिशन एजंट" ची भूमिका पार पाडण्याचे काम आदिवासी सहकारी संस्थांनी करून त्याचा फायदा आदिवासी सभासदांना करून देणे आवश्यक आहे. परंतु त्यांनी आदिवासी सभासदांना दलालाप्रमाणे नडवू नये.

4.13.7 "कर्ज वसुली" हा विषय महामंडळ, सहकारी आणि राष्ट्रीय बँका इत्यादींना सतत डोकेदुखीचा ठरलेला आहे. या सरकारी यंत्रणांनी कर्जवसुलीबाबत आदिवासी सहकारी संस्थांचा वापर करून घेणे आवश्यक आहे. त्यातील काही भाग अथवा विशिष्ट टक्केवारी कर्ज वसुलीच्या मोबदल्यात या आदिवासी सहकारी संस्थांना दिल्यास कर्ज वसुलीच्या प्रमाणात सुधारणा होण्याची शक्यता आहे व त्यामुळे आदिवासी सहकारी संस्थांच्या आर्थिक उलाढालीत वाढही होईल.

4•13•8 आदिवासी सहकारी संस्थांना इतर व्यवहार हाताळण्यासाठी अतिरिक्त कर्मचा-यांची आवश्यकता आणि असे व्यवहार करताना संस्थांना येणा-या तोट्याची शक्यता गृहीत धरून महाराष्ट्र शासनाने व्यवस्थापकीय अनुदान दिलेले आहे• ब-याच संस्था असे व्यवहार करीत नाही परंतु त्यांनाही व्यवस्थापकीय अनुदान मिळाले आहे• अशा संस्थांनी या व्यवस्थापकीय अनुदानाचा वापर करून आपल्या भूमिहीन सभासदांना रोजगार मिळवून द्यावा असे वाटते•

4•13•9 पुनर्रचित आदिवासी सहकारी संस्था अधिक कार्यक्षम करण्यासाठी मूलतः त्या त्या संस्थांचे सभासद जागृत असणे आवश्यक आहे• त्याकरिता सभासदांमध्ये जागृती निर्माण होऊन संस्थेच्या कामकाजाबाबत सभासद संवेदनशील राहील अशा उपाययोजनेची अथवा मोहिमेची शक्यता आदिवासी विकास महामंडळाने अजमावून पहाणे आवश्यक आहे असे वाटते•

••••

संदर्भ : 1•महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक यांचे सन 1988-89, 1991-92 व 1992-93 चे वार्षिक अहवाल•

2•जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन जिल्हा-यवतमाळ सन 1992-93•

3•आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेची सांख्यिकी मालिका क्र•36 ‹सन 1991 जनगणना आकडेवारी›

4•मा•पिचड समितीचा आदिवासी सेवा सहकारी संस्था पुनर्रचना शिफारशींचा अहवाल ‹1984-85›•

••••

परिशिष्ट अ

---------

§अ§ "आदिवासी सेवा सहकारी संस्था", चांगल्या रितीने कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने त्यांची पुनर्रचना करण्यात यावी.

§ब§ "आदिवासी सेवा सहकारी संस्थांना दिलेल्या व्यवस्थापकीय कर्जाचे राहिलेल्या चार वर्षाच्या कर्जाचे अनुदानात रुपांतर करण्यात यावे" आणि

§क§ "आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील आदिवासींकरिता वैयक्तिक व कौटुंबिक लाभाच्या योजना आखून कार्यान्वित करण्यात याव्यात" ह्या तीन विषयांचा सखोल अभ्यास करुन शासनास अहवाल सादर करण्यासाठी समितीची नियुक्ती करणेबाबत.

....

महाराष्ट्र शासन

आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक : एसीएस-1081/§1059§/का-4,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-32.

दिनांक 30 जानेवारी, 1984

शासन निर्णय : वर नमूद केलेले तीन विषय जनजाती सल्लागार समितीच्या § T.A.C § दिनांक 19 जानेवारी, 1984 च्या बैठकीत चर्चेसाठी आले असता असा निर्णय घेण्यात आला की, ह्या तीन्ही विषयांचा सांगोपांग विचार करुन शासनाला ठोस सूचना/उपाय सुचविण्यासाठी एक समिती नेमण्यात यावी. तद्नुषंगाने शासन आता खालील समिती स्थापन करीत आहे :-

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | श्री.मधुकर पिचड, विधानसभा सदस्य | .. | अध्यक्ष |
| 2. | श्री.बाबुराव मडावी, विधानसभा सदस्य | .. | सदस्य |
| 3. | श्री.हरिभाऊ महाले, विधानसभा सदस्य | .. | सदस्य |
| 4. | श्री.किसनराव पाचपुते, विधानसभा सदस्य | .. | सदस्य |
| 5. | श्री.माणिकराव गावित, संसद सदस्य | .. | सदस्य |
| 6. | महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचा प्रतिनिधी | .. | सदस्य |

7• व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ• •• सदस्य

8• संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे •• सदस्य

9• सहनिबंधक, सहकारी संस्था ‹आदिवासी विकास› नाशिक• •• सदस्य-सचिव

2• वरील पार्श्वभूमीवर सदर समितीने वर नमूद केलेल्या तीन विषयांचा सखोल अभ्यास करुन त्याबाबतच्या शिफारशींचे दोन स्वतंत्र अहवाल शासनास दोन ‹2› महिन्यात सादर करावेत• "आदिवासी सेवा सहकारी संस्थांची पुनर्रचना व व्यवस्थापकीय कर्जाचे अनुदानात रुपांतर" याबाबतचा अहवाल तयार करण्यास समितीला सहनिबंधक सहकारी संस्था ‹आदिवासी विकास› हे मदत करतील• तर "आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील आदिवासींसाठी वैयक्तिक व कौटुंबिक लाभाच्या योजना आखणे" याबाबतचा अहवाल तयार करण्यास संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था हे मदत करतील•

3• या समितीवर असणारे अशासकीय सदस्य शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक:टीआरए/1470/131/18, दिनांक 27 जानेवारी, 1971 मधील तरतुदीनुसार प्रवासभत्ता व दैनिक भत्ता मिळण्यास पात्र ठरतील• या देयकांवर प्रतिस्वाक्षरी करण्यास सहनिबंधक, सहकारी संस्था ‹आदिवासी विकास›, नाशिक यांना प्राधिकृत करण्यात येत आहे•

4• वरील बाबीवर होणारा खर्च अर्थशीर्ष "298, सहकार-पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-जनजाती क्षेत्र उपयोजना-‹ए› संचालक व प्रशासन ‹ए› राज्य योजनांतर्गत योजना-मागणी क्रमांक 167 ‹कोड क्रमांक 298 1108›" ह्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकून त्या लेखा शीर्षाखाली चालू वित्तीय वर्षी केलेल्या तरतुदीमधून भागविण्यात यावा•

5• हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक : सीआर-177/84/इएक्सपी-11, दिनांक 27 जानेवारी 1984 अन्वये निर्गमित करण्यात येत आहे•

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने•

‹चं•स•कारखानीस›
कार्यासन अधिकारी

परिशिष्ट ब

---------

आदिवासी सेवा सहकारी संस्थांची पुनर्रचना व व्यवस्थापकीय कर्जाचे अनुदानात रुपांतर करण्याबाबत..

---

महाराष्ट्र शासन

आदिवासी विकास विभाग

शासन निर्णय क्रमांक : एसीएस -1084/41973/प्र.क्र.1534/का-4,

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-32.

दिनांक 24 एप्रिल, 1990

वाचा : 1) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्रमांक:एसीएस-1081/(1059)/का-4, दिनांक 30 जानेवारी, 1984.

2) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्रमांक:एसीएस-1084/41973/ /(1534)/का-4, दिनांक 10 जुलै, 1985.

शासन निर्णय : महाराष्ट्र राज्यात सध्या अस्तित्वात असलेल्या आदिवासी सेवा सहकारी संस्थांचे कार्यक्षेत्र हे सुमारे 30 ते 40 कि.मी.अंतराच्या परिसरात पसरलेले असल्यामुळे एवढ्या मोठया कार्यक्षेत्रात पसरलेल्या आदिवासी सेवा सहकारी संस्थांना त्यांच्या सदस्यांशी संपर्क ठेवणे तसेच योग्य प्रकारे देखरेख करणे, नियंत्रण ठेवणे इत्यादी बाबतीत अडचणी येत असल्यामुळे त्या संस्था आर्थिक व प्रशासकीय दृष्ट्या डबघाईला आलेल्या आहेत. शिवाय, सभासदांना सुध्दा फारच गैरसोयीचे होत असे. त्या संस्था अधिक कार्यक्षम होण्याच्या दृष्टीने जनजाती सल्लागार समितीच्या दिनांक 19 जानेवारी, 1984 रोजी झालेल्या बैठकीत विचार विनिमय करण्यात येऊन आदिवासी सेवा सहकारी संस्थांचा अभ्यास करण्यासाठी व त्याबाबत निश्चित सूचना व सुधारात्मक शिफारशी शासनास करण्याचे दृष्टीने एक समिती नेमण्यात यावी अशी शासनास शिफारस करण्यात आली. या जनजाती सल्लागार समितीच्या शिफारशीनुसार शासन निर्णय आदिवासी विकास विभाग, क्रमांक:एसीएस-1081/(1059)/का-4, दिनांक 30 जानेवारी, 1984 अन्वये त्यावेळचे विधानसभा सदस्य मा.मधुकरराव पिचड माजी राज्यमंत्री, आदिवासी विकास यांचे अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली होती. या समितीने याबाबतीत संपूर्ण अभ्यास व विचार विनिमय करून दिनांक 16-12-1984 रोजी शासनास शिफारशी वजा अहवाल सादर केला. सदर अहवालातील शिफारशींची तपासणी करून शासनाच्या विचारासाठी

योग्य प्रस्ताव तयार करण्याकरिता शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक:एसीएस/-1084/41973/(1534)/का-4, दिनांक 10 जुलै, 1985 अन्वये शासनाने एक शक्तीप्रदान समितीची नेमणूक केली. सदर शक्तीप्रदान समितीच्या शिफारशीवर विचार विनिमय करून शासनाने आदिवासी सेवा सहकारी संस्थांची पुनर्रचना करणे व व्यवस्थापकीय कर्जाच्या चौथे वर्ष ते सातव्या वर्षाच्या बाकीचे अनुदानात रुपांतर करणेबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेतलेले आहेत.

1) आदिवासी सेवा सहकारी संस्थांची पुनर्रचना करणे

सध्या अस्तित्वात असलेल्या आदिवासी सेवा सहकारी संस्थांचे 30 ते 40 कि.मी. असलेले कार्यक्षेत्र कमी करून ते 5 ते 10 कि.मीटरपर्यंतच ठेवून व साधारणपणे 5000 लोकसंख्येसाठी एक याप्रमाणे नव्याने आदिवासी सेवा सहकारी संस्थांची पुनर्रचना करण्यास शासन मंजुरी देत आहे.

तसेच अशाप्रकारे आदिवासी सेवा सहकारी संस्थांची पुनर्रचना करताना सध्या अस्तित्वात असलेल्या आदिवासी सेवा सहकारी संस्था अवसायानात (लिक्वीडेशन) काढण्यात याव्यात. मात्र या संस्था अवसायानात (लिक्वीडेशन) काढताना किंवा याबाबतची प्रक्रिया चालू असताना जुन्या आदिवासी सेवा संस्थातील सभासदांना कर्ज सुविधा व इतर सुविधा उपलब्ध होतील याची योग्य ती दक्षता घेण्यात यावी.

2) एकाधिकारी खरेदीमध्ये कमिशन वाढवून देणे

एकाधिकार खरेदी योजनेखाली आदिवासी सेवा सहकारी संस्थांना सध्या प्रति क्विंटलमागे देण्यात येत असलेले कमिशन हे यापुढे प्रति क्विंटलवर न देता खरेदीच्या व्यवहाराच्या टक्केवारीवर देण्यात यावे, याबाबतचे आदेश लवकरच निर्गमित केले जातील.

3) रास्त भावाचे धान्य दुकान व्यवहारात मिळणारे कमिशन वाढवून देणेबाबत

आदिवासी भागात स्वस्त धान्य/कापड दुकाने मंजूर करताना आदिवासी सेवा सहकारी संस्थांना सर्वप्राधान्य देण्यात यावे.

4) आदिवासी सेवा सहकारी संस्थांना चतुर्थ वर्ष ते सातव्या वर्षाकरिता देण्यात आलेल्या व्यवस्थापकीय कर्जाचे अनुदानात रुपांतर करणे

आदिवासी सेवा सहकारी संस्थांना चतुर्थ वर्ष ते सातव्या वर्षाकरिता देण्यात आलेल्या व्यवस्थापकीय कर्जाचे अनुदानात रुपांतर करण्यात यावे.

5) पुनर्रचित आदिवासी सेवा सहकारी संस्थांना धान्य खरेदी व स्वस्त कापड दुकाने हे उपक्रम चालविण्याकरिता प्रतिवर्षी अनुदान देणेबाबत

पुनर्रचित आदिवासी सेवा सहकारी संस्थांना जर धान्य दुकाने, स्वस्त कापड दुकाने किंवा जीवनोपयोगी वस्तूंचे वितरणाचे काम करताना त्यात काही तोटे सहन करावे लागतात, तर सदर पुनर्रचित आदिवासी सेवा सहकारी संस्थांना या वस्तूंचे वितरणापोटी जेवढे तोटे येतील तेवढे अनुदान रूपाने देण्यात यावे.

6) पुनर्रचित आदिवासी सेवा सहकारी संस्थांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील इतर उद्योग व नवीन नांव देण्याबाबत

पुनर्रचित आदिवासी सेवा सहकारी संस्था या त्यांच्या कार्यक्षेत्रात केंद्र संस्था मानून फक्त त्यांचे कार्यक्षेत्रातील दुग्ध व्यवसाय, मजूर कंत्राटदारी कामे, मत्स्य व्यवसाय इत्यादी व्यवसाय सुध्दा त्यांना हाताळण्यासाठी देण्यास शासन मंजुरी देत आहे. पुनर्रचना करण्यात येणा-या आदिवासी सेवा सहकारी संस्थांचे नांव यापुढे "आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था" असे ठेवण्यात यावे.

7) पुनर्रचित आदिवासी सेवा सहकारी संस्थांना व्यवस्थापकीय अनुदान देण्याबाबत

नव्याने पुनर्रचित होणा-या आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थांना जास्तीत जास्त 5 वर्षासाठी 100 टक्के व्यवस्थापकीय अनुदान देण्यास शासन मान्यता देत आहे. तसेच या पुनर्रचित आदिवासी विविध कार्यकारी संस्थांच्या कामकाजाबाबत दोन वर्षानंतर आढावा घेण्यात यावा.

8) शासनाने वरीलप्रमाणे घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी सुमारे रु. 2.63 कोटी जादा खर्च येणार असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| शिफारस क्रमांक | विषय | रक्कम (रु.लाखात) | अभिप्राय |
|---|---|---|---|
| 5 | व्याज अनुदान | 0·85 | प्रत्येक वर्षी |
| 6 | रास्त भावाचे दुकानाकरिता व्यवस्थापकीय अनुदान | 3·525 | प्रत्येक वर्षी |
| 15 | व्यवस्थापकीय अनुदान | 94·50 | प्रत्येक वर्षी |
| 16 | राज्यभाग | 163·60 | फक्त एकदा |
| 23 | राज्यभाग | 0·80 | फक्त एकदा |
| | | 0·04 | 5 वर्षाकरिता प्रत्येक वर्षी |
| | एकूण | 263·315 | |

या योजनेच्या अंमलबजावणीसंबंधी दोन वर्षांनी आढावा घेण्यात यावा. मध्यंतरीच्या काळात वर नमूद केलेल्या प्रत्येक बाबीसाठी दर्शविलेल्या आर्थिक भाराच्या मर्यादेपर्यंत जादा वित्तीय वर्ष सिमित ठेवावा.

वरील जादा खर्च भागविण्यासाठी सन 1990-91 या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात यावी.

हा शासन निर्णय, सहकार व वस्त्रोद्योग विभाग, नियोजन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाचा अनौपचारिक संदर्भात क्रमांक :प्र.क्र.29/ 90/व्यय-11, दिनांक 19-4-1990 अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

सही/-
(भास्कर पाटील)
सह सचिव, महाराष्ट्र शासन,
आदिवासी विकास विभाग.

## आदिवासी सहकारी संस्थांच्या पुनर्रचनेनंतरच्या कार्याबाबतचा मुल्यमापण अहवाल.

प्रपत्र क्रमांक :- १

आदिवासी सेवा सहकारी संस्थेसाठी पत्रक.

चौक क्रमांक :- १.

१. संस्थेचे नांव गांव
तालुका जिल्हा.

२. संस्थेची मुळ स्थापना दिनांक / x१९ पुर्नरचनेनंतरचा दिनांक / /

३. संस्थेची इमारत स्वत:ची/भाड्याचे व कर्मचारी वर्ग संख्या
[योग्य ठिकाणी अशी ✓ खुण करा.]

४. संस्थेचे एकुण सभासद आदिवासी बिगर आदिवासी

५. संस्थेचे एकुण भाग भांडवल [सायात] :-

६. संस्थेच्या कार्यक्षेत्रामधील एकुण गांवे :-

७. संस्थेच्या कार्यक्षेत्रामध्ये आदिवासी विकास महामंडळामार्फत राबविल्या जाणाऱ्या एकाधिकार खरेदी योजनेद्वारे कोणत्या धान्याची/गौण वनोपाजाची आवक होते.

८. १] तांदुळ २] ज्वारी ३] गहू ४] डाळी ५] हिरडा ६] डिंक ७] मोहुची ८] फुले ९] फळे १०] चारोळी ईत्यादी.

[योग्य असेल त्यावर ✓ अशी खुण करा.]

९. धान्य/कडधान्ये/गौणवनोपज साठी संस्थेच्या कार्यक्षेत्रातील असलेली खरेदी केंद्राची संख्या.................

....२.

चौकट क्रमांक :- २ आदिवासी विकास महामंडळाकडून राज्यात केल्या जाणाऱ्या एकाधिकार धान्य व गौणवनोपज खरेदी योजनेखाली संस्थेकडून झालेला खरेदी व्यवहार..............

| अ.क्र. | विवरण | वर्ष | | | | | | | | क्विंटल व रुपयांमध्ये | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९८९ | | १९९० | | १९९१ | | १९९२ | | १९९३ | |
| | | वजन | किंमत | वजन | किंमत | वजन | किंमत | वजन | किंमत | वजन | किंमत |
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. |
| १. | अन्न धान्य | | | | | | | | | | |
| | गहू | | | | | | | | | | |
| | तांदूळ | | | | | | | | | | |
| | ज्वारी | | | | | | | | | | |
| | बाली | | | | | | | | | | |
| | चना | | | | | | | | | | |
| | इतर | | | | | | | | | | |
| | एकूण | | | | | | | | | | |

[ कृ. मा. पत्रा. ३ ]

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

२. गौण वनोपज

हिरडा

चारोळी

डिंक

महू फुले

इतर -----

एकूण :-

चौक क्रमांक :- ३ तंत्स्थोने केलेला विक्री व्यवहार

| अ.क्र. | विवरण | १९८९ | | १९९० | | १९९१ | | १९९२ | | १९९३ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | वजन | किंमत | वजन | किंमत | वजन | किंमत | वजन | किंमत | वजन | किंमत |
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. |

१. अन्नधान्य

--------

--------

--------

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

२] जीवनवनोपज

--------

--------

--------

सूचना :-

३] इतर वस्तु

रॉकेल

ताडार

कापड, बैलगाडी

सूचना :-

प्रौफ क्रमांक :- ४ तंत्रज्ञांच्या विक्री व्यवहारातून मिळालेला नफा/तोटा/कमिशन इत्यादी.

| अ.क्र. | विवरण | १९८९ | | १९९० | | १९९१ | | १९९२ | | १९९३ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नफा | तोटा | नफा | तोटा | नफा | तोटा | नफा | तोटा | नफा | तोटा |

१] अन्नधान्य

--------

--------

--------

सूचना :

| १. | २. | ३. | ४ | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १० | ११. | १२ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |

२. गौण वनोपज [कोटीत रुपये]

एकूण :-

३. इतर

एकूण :-

चौक क्रमांक :— ५ आदिवासी सहकारी संस्थेस शासनाकडून/सरकार कार्यालयाकडून मिळालेले फायदे/सूट.

| अ.क्र. | प्रकार | १९८९ | १९९० | १९९१ | १९९२ | १९९३ |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. |
| १. | व्यवस्थापनासाठी मिळा-लेले कर्ज व त्यातून सूट | | | | | |
| २. | व्यवस्थापनासाठी कर्ज [१५ वर्षे मिळण्यासाठी] | | | | | |
| ३. | संस्थेस गोदाम बांधण्यासाठी कर्ज. | | | | | |
| ४. | गोदाम बांधकामाच्या कर्जातून मिळालेली सूट | | | | | |
| ५. | बुडीत कर्जापोटी राखीव निधी. | | | | | |
| ६. | आदिवासींना व्याजापोटी सूट. | | | | | |
| ७. | गोदामातील सुधारणेसाठी कर्ज/अनुदान. | | | | | |
| ८. | राज्य/जिल्हा सहकारी बोर्डाकडून व्यवस्थापकीय सदस्य/कर्मचाऱ्यांच्या प्रशि-क्षणासाठी [संख्या] | | | | | |
| ९. | कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानासाठी कर्ज. | | | | | |
| १०. | ट्रक खरेदीसाठी कर्ज अथवा सूट. | | | | | |

— ७ —

**चौक क्रमांक :- ६ संस्थेच्या गौण वनोपजाच्या /इतर धान्याच्या उपलब्धतेसाठी व प्रक्रीया करण्यासाठी काही योजना.**

१. प्रतवारी करणे होय/नाही.

२. साठवणुकीसाठी गोदाम आहे काय ? होय/नाही.
नसल्यास भाड्याने मिळाला आहे काय ? होय/नाही.

३. संस्थेच्या इतर धान्याबाबतचा प्रतवारी करण्याचे उद्योग आहेत काय ? होय/नाही.

४. अ] आदिवासी सभासदांना गौण वनोपजासाठी खरेदी लाभांश दिला काय ? होय/ नाही.

ब] नसल्यास का दिला जात नाही ?

क] संस्थेत गौण वनोपज गोळा करण्यासाठी काही हत्यारे/इतर साधने पुरविते काय ? होय/नाही.

ड] असल्यास कोणती साधने आहेत. ? उल्लेख करावा ]

---

**चौक क्रमांक :- ७ संस्थेच्या पुर्नरचनेनंतर कर्ज वाटप /खरेदी विक्री व्यवहाराबद्दलचे अभिप्राय.**

१. संस्थेच्या पुर्नरचनेनंतर जास्तीत जास्त आदिवासी सभासदांना कर्ज पुरवठा वेळेवर होतो काय ? होय/नाही.

२. खरेदी/विक्री व्यवहारामध्ये सुधारणा झाली आहे काय ? होय/नाही.

३. गौण वनोपज जास्त प्रमाणात गोळा होत आहे काय ? होय/नाही.

— ८ —

चौक क्रमांक :- ८ <u>संस्थेने करावयाच्या सूचना</u>

१. संस्थेचा कारभार सुधारण्यासाठी आपणांकडे काही सूचना आहेत काय ?
होय / नाही.

२. असल्यास थोडक्यात वर्णन करा.

ठिकाण

दिनांक :- / /१९९

मुलाखत घेणारा अधिकारी,
कर्मचा-याची स्वाक्षरी.

अहिरे/६८१९९४

आदिवासी सहकारी संस्थांच्या पुनर्रचनेनंतरच्या
कार्याबाबतचा मूल्यमापन अहवाल

---

प्रपत्र - १ [अ]

आदिवासी सहकारी संस्थेसाठी पत्रक

---

१] संस्थेचे नांव :

२] संस्थेचा पत्ता : गाव तालुका
जिल्हा

३] संस्थेचा मूळ स्थापना दिनांक :

४] संस्थेच्या पुनर्रचनेचा दिनांक :

५] संस्थेची स्वत:ची/भाडेची इमारत :

६] कर्मचारी वर्ग [संख्या]

अ] संस्थेच्या पुनर्रचनापूर्वी : सचिव इतर

ब] संस्थेच्या पुनर्रचनेनंतर : सचिव इतर

७] अ] संस्थेच्या पुनर्रचनेनंतर कर्मचारी वर्गात वाढ झाली काय ? :

ब] वाढ झाली असल्यास कोणाची पूर्व परवानगी घेतली ? :

८] संस्थेत "सचिव" नेमला असल्यास त्यांना मिळणार वेतन. : रु. /-

९] संस्थेच्या कार्यक्षेत्रात असलेली गावे नावे पाडावीत. : १] २]
३] ४]
५] ६]

१०] संस्थेचे कार्यक्षेत्र किती कि. मी. च्या सीमेत आहे ? : १] पुनर्रचनेपूर्वी
२] पुनर्रचनेनंतर

११] संस्थेमार्फत आदिवासी सभासदांसाठी कोणत्या योजना राबविल्या जातात. [यादी] : १]
२]
३]

१२] संस्थेमार्फत आदिवासी लाभधारकांना पुरविण्यात आलेल्या कर्जाचा तपशील:

| तपशील | १९८९-९० | | १९९०-९१ | | १९९१-९२ | | १९९२-९३ | | १९९३-९४ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लाभार्थी संख्या | रक्कम रू. | ला. | र. | ला. | र. | ला. | र. | ला. | र. |
| १] अल्पमुदत कर्ज [खावटी] | | | | | | | | | | |
| २] मध्यममुदतकर्ज | | | | | | | | | | |
| ३] पीक कर्ज [नवीन] | | | | | | | | | | |
| ४] थकबाकीदार असलेल्या लाभार्थ्यांना पुन्हा उपलब्ध करून दिलेले कर्ज. | | | | | | | | | | |

१३]अ] जुने पीक कर्ज थकबाकीदार [सन १९८९-९० मधील] : संख्या.......... रक्कम रू..........

ब] थकबाकी परतफेडीसाठी १० वार्षिक हप्त्यांची सवलत देण्यात आली आहे का ? : -"- -"-

१४] पीक कर्ज बिनव्याजी पुरविले जाते का?[सन १९८९-९० व ९०-९१] : -"- -"-

१५अ]आदिवासी शेतक-यांना शेतीसाठी बी-बियाणे, खते इ. साहित्य पुरविले जाते का? : संख्या........... रक्कम रू..........

ब] शेती विषयक साधने पुरविली असल्यास: संस्थेने ती कोणाकडून उपलब्ध करून घेतली ? आदिवासी विकास महामंडळ/बँका

....३..

क] शेती विषयक साधने पुरविलेल्या लाभ- धारकांची वर्षनिहाय संख्या. : १] १९८९-९०
२] १९९०-९१
३] १९९१-९२
४] १९९२-९३
५] १९९३-९४

१६]अ] एकाधिकारी योजनेत संस्थेस तोटा आला काय ? :

ब] तोटा भागविण्यासाठी संस्थेस कमीशन वाढवून मिळाले का ? :

१७] रास्त भाव दुकान व्यवहारात संस्थेस कमीशन वाढवून मिळाले का ? :

१८] आदिवासी सहकारी संस्थेस व्यवस्थापकीय अनुदान मिळाले का? :

१९] आदिवासी सहकारी संस्थेचे व्यवहार सुरळीत चालण्यासाठी शासकीय भाग भांडवल मिळाले का ? :

२०] संस्थेस "ऑडिट फी" अथवा "सुपर- व्हिजन फी" आकारली जाते का ? :

२१] संस्थेमार्फत मजूर कंत्राट पध्दतीची कामे केली जातात का ?
केली असल्यास तपशील द्यावा. :

२२] संस्थेमार्फत मच्छिमार व्यवसायाची कामे केली जातात का ?
केली असल्यास तपशील द्यावा. :

२३] संस्थेमार्फत दुध वितरणाचे काम केले जाते का ? इतर दुग्ध वितरण संस्थांचे व्यवहार आदिवासी सहकारी संस्थाकडे आहेत काय ? :

... ४...

२४] आदिवासी विकास संस्थेचा प्रतिनिधी :
शासनाच्या/बँकाच्या/महामंडळाच्या
समितीवर आहे काय ?

२५] आदिवासी सहकारी संस्थेसारखी :
उद्दिष्टे असलेल्या इतर संस्था
संस्थेच्या कार्यक्षेत्रात आहेत काय ?

२६] संस्थेस झालेला नफा/तोटा व कारणे :
१९८९ ते ९३ च्या तपशीलासह

२७] सभासदांकडून कर्ज वसुलीचे प्रमाण : वर्ष:- ८९-९० ९०-९१ ९१-९२ ९२-९३
सन १९८९ ते ९३ तपशीलासह

| वर्ष | ८९-९० | ९०-९१ | ९१-९२ | ९२-९३ |
|---|---|---|---|---|
| कर्ज | | | | |
| वसुली रु. | | | | |

मुलाखत घेणाऱ्या कर्मचारी/
अधिकारी यांची सही.

## आदिवासी सहकारी संस्थांच्या पुर्नरचनेनंतरच्या कार्याबाबतचा मुल्यमापन अहवाल

---

### प्रपत्र–२

### आदिवासी सेवा सहकारी संस्थेतील लाभार्थी सदस्यांसाठी पत्रक

#### चौक क्रमांक १  प्राथमिक माहिती

१) आदिवासी सहकारी संस्थेचे नांव : ____________________

तालुका ______________ : जिल्हा ______________

२) लाभार्थी/सदस्याचे नांव ____________________

३) आदिवासी होय / नाही : बिगर आदिवासी होय / नाही

४) गांव ______________ तालुका ______________ जिल्हा ______________

५) लाभार्थी कुटुंबातील संख्या (कमावणारे) ______________

६) साक्षर – होय/नाही        निरक्षर होय/नाही

७) लाभार्थीचा मुख्य व्यवसाय : शेती/मजुरी/नोकरी/धंदा
(योग्य असेल त्यावर ✓ खूण करावी)

८) लाभार्थीचा दुय्यम व्यवसाय : ____________________

९) लाभार्थीची जमीन प्रकार : बागायत जिरायत एकूण

हेक्टर ________ ________ ________

१०) लाभार्थी संस्थेचा सभासद किती वर्षांपासून आहे ______________

११) सभासदाचा संस्थेचे किती भाग आहे ______________

१२) त्या भागाबद्दल सभासदास दरवर्षी लाभांश मिळतो काय होय / नाही

अ) मिळत असल्यास रक्कम ______________

#### चौक क्रमांक २ आदिवासी/बिगर आदिवासी लाभार्थ्यांना सहकारी संस्थेमार्फत मिळणारे फायदे/सवलती

(रुपयात)

| क्र. | मिळणाऱ्या फायद्याचा प्रकार | वर्ष | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | १९८९ | १९९० | १९९१ | १९९२ | १९९३ |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

१) लघुमुदतीचे कर्ज
(पीक कर्ज सहकारी सोसायटी)

अ. काही कर्ज माफ झाले असल्यास

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| | २] मध्यम मुदतीचे कर्ज [सहकारी बँक मार्फत] | | | | | |
| | ३] दररोजच्या गरजा भागविण्यासाठी कर्ज [खावटी] [आदिवासी विकास महामंडळा- मार्फत मिळणारे] | | | | | |
| | ४] भाग खरेदीसाठी कर्ज [बँकेच्या सौजन्याने] | | | | | |
| | ५] जिवनोपयोगी सामानाचा पुरवठा किलो/लीटर | | | | | |
| | तांदूळ | | | | | |
| | रॉकेल | | | | | |
| | ज्वारी | | | | | |
| | गहू | | | | | |
| | इतर | | | | | |
| | ६] रासायनिक खते व किटकनाशके [सहकारी बँकेमार्फत] | | | | | |
| | ७] इतर | | | | | |

चौक क्रमांक ३ - लाभार्थी सदस्याचे धान्य व गौण वनोपज खरेदी आदिवासी विकास महामंडळाने संस्थेमार्फत करीत असलेला व्यवहार

१ लाभार्थी सदस्याचे धान्य व गौण वनोपज संस्था दरवर्षी खरेदी करते काय होय / नाही

२ खरेदी केले असल्यास सन १९९२ ची आकडेवारी द्यावी.

| | क्विंटलमध्ये | रुपयांमध्ये |
|---|---|---|
| अ. धान्यखरेदी | | |
| ब. गौण वनोपज खरेदी | | |

३ इतर बाबी

चौक क्रमांक ४ : सहकारी संस्थेची पुर्नरचना व त्यानंतरचे परिणाम

१ आदिवासी सहकारी संस्थेच्या पुर्नरचनेबद्दल आपणांस काही माहिती आहे काय?

-३-

२ तुमच्या संस्थेची पुनर्रचना कोणत्या वर्षी महिना
महिन्यात व कार्यान्वित झाली आहे

३ संस्थेच्या पुनर्रचनेपूर्वी आपणांस कर्ज/सावकारी होय / नाही
वेळेवर मिळत होती काय?

४ कर्ज/सावकारी वेळेवर मिळत नव्हते तेव्हा
काय अडचणी येत होत्या?

५ धान्य, उत्पन्न, गौण वनोपजविक्रीबाबत
पुनर्रचनेपूर्वी काय अडचणी होत्या ?

६ गौण वनोपज खरेदीमध्ये पूर्वी रास्त
भाव दिला जात होता काय?

७ रास्तभाव मिळत नसल्यास त्यामागील
कारणे काय होती?

८ संस्थेच्या सध्याच्या पुनर्रचनेनंतरच्या कामकाज
पद्धतीबद्दल आपला काय अभिप्राय आहे?

९ पुनर्रचनेनंतरच्या कामकाज पद्धतीबाबत
आपणास काही सूचना करावयाच्या
अपेक्षित आहे काय? होय/नाही

१० असल्यास थोडक्यात नमूद कराव्या १
२
३
४
५

गुमास्ता घेणाऱ्या
कर्मचारी/अधिकारी
यांची स्वाक्षरी

ठिकाण :

दिनांक

---

प्रपत्र क्र. ३

सहाय्यक निबंधक/सब रिजनल मॅनेजर
सहकार खाते/सहकारी आदिवासी विकास मंडळ
यांच्यासाठी प्रश्नावली

चौक क्रमांक १ : सर्वसाधारण माहिती

१] पुर्ण नांव : ................................................................

सहाय्यक निबंधक/सबरिजनल मॅनेजर

२] तालुका                                    ३] जिल्हा

४] कार्यक्षेत्रातील एकुण सहकारी संस्था —————— त्यापैकी आदिवासी सहकारी संस्था ——————

चौक क्रमांक २ : आदिवासी सहकारी संस्थांच्या पुर्नरचनेबाबतची प्रतिक्रीया

१] आपल्या तालुक्यातील आदिवासी सहकारी संस्थांची पुर्नरचना केंव्हा झाली तो दिनांक द्यावा.

२] पुर्नरचनेच्या पुर्वीच्या आदिवासी सहकारी संस्थांच्या कामाचा व प्रगती बाबतचा थोडक्यात स्वरूपात आढावा द्यावा.

३] पुर्नरचनेच्या काळात आदिवासी सहकारी संस्थांच्या कामकाजामध्ये काय बदल झाला. आदिवासींना त्याबाबत कोणते फायदे झाले आहेत याबर अभिप्राय द्यावेत.

४] पुनर्रचनेनंतरचे संस्थेच्या कामामध्ये आपणांस काही बदल सुचवायचे आहेत काय?

५] आदिवासी सहकारी संस्था अधिक कार्यक्षम बनण्यासाठी कोण कोणत्या प्रयत्नांची आवश्यकता आहे.

दिनांक :

ठिकाण :

सहाय्यक निबंधक / सब रिजनल मॅनेजर
सहकार विभाग आदिवासी विकास महामंडळ

— x o x —